वर्ष ३ रे अंक १४० पृष्ठे ६ किंमत ३ रुपये मुख्य आवृत्ती

RNI.NO.MAHMAR २०२१/८२५००

YTL/258/2022-25

dainikpublicpost@gmail.com




खून प्रकरणातील आरोपी गजाआड

पान ६

दैनिक

# पब्लिक पोस्ट

गुरुवार, २१ सप्टेंबर २०२३

THE NAME OF BRAND

विश्वास आपुलकी !

## आजचा सुविचार

उठा, जागे व्हा आणि लक्ष्य पूर्ण होईपर्यंत थांबू नका – स्वामी विवेकानंद

## ४५४ खासदारांचा पाठिंबा, मोदी सरकारची आता राज्यसभेत परीक्षा

# महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**नवी दिल्ली, ता. २१ : देशभरात गेल्या दोन दिवसांपासून ज्याची चर्चा सुरू आहे ते महिला आरक्षण विधेयक लोकसभेत पारित करण्यात आलं आहे. लोकसभा आणि देशातल्या सर्व राज्यांमधील विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षणाच्या बहुप्रतीक्षित विधेयकाला सोमवारी (१८ सप्टेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यानंतर मंगळवारी पतंप्रधान नरेंद्र मोदी आणि सर्व खासदारांनी नव्या संसदेत प्रवेश केला. नव्या संसदेतील पहिल्याच भाषणावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे विधेयक लोकसभेच्या पटलावर ठेवलं. यावर दोन दिवस सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी चर्चा केली. कोणत्याही प्रमुख पक्षाने या विधेयकाला विरोध केला नाही. परंतु विरोधी पक्षांनी याची अंमलबजावणी लवकर व्हावी, तसेच यात ओबीसींचा समावेश व्हावा अशा मागण्या केल्या.**



दरम्यान, महिला अरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. आता राज्यसभेत मोदी सरकारची खरी परिक्षा असणार आहे. कारण राज्यसभेत मोदी सरकारकडे बहुमत नाही. परंतु, हे विधेयक पारित होण्यात अडचण येणार नाही असं चित्र दिसतंय. कारण या विधेयकाला देशभरातून समर्थन मिळत आहे आणि कुठल्याही मोठ्या पक्षाने या विधेयकाला विरोध केला नाही. लोकसभेत बुधवारी (२० सप्टेंबर) सायंकाळी ७ वाजता या विधेयकावर मतदान घेण्यात आलं. यावेळी लोकसभेतील ४५४ सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केलं. तर केवळ दोन खासदारांनी या आरक्षण विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. मतदानावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत उपस्थित होते. दरम्यान, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी हे विधेयक लोकसभेत पारित करण्यात आल्याची घोषणा केली. मतमोजणीनंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, एकूण ४५४ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूने मतदान केलं आहे. तर दोन सदस्यांनी विरोधात मतदान केलं आहे. सभागृहातील एकूण सदस्यसंख्या आणि सध्या उपस्थित असून मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश मतांसह हे विधेयक मंजूर केलं जात आहे. लोकसभेत महिला आरक्षणाचा मुद्दा मांडण्यात आला आणि त्यानंतर त्यावरुन सुरु झाली ती श्रेयवादाची लढाई. काँग्रेसचं म्हणणं आहे की आम्हीच महिला आरक्षण बिल आणलं होतं. मात्र भाजपा ही बाब मान्य करायला तयार नाही. दुसरीकडे काँग्रेसने हा आरोप केला आहे की महिला आरक्षण बिल निवडणुकीच्या तोंडावर आणलं जातं आहे कारण हा एक जुमला आहे. या सगळ्यावर आज दिवसभर चर्चा झाली. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नारी शक्ती वंदन बिल हा आमच्यासाठी राजकीय मुद्दा नाही असं म्हटलं आहे.

महिला आरक्षण विधेयक मंजूर झाल्याने महिलांच्या अधिकारांची एक प्रदीर्घ लढाई संपणार आहे. जी २० परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला नेतृत्वाखालील विकासाचं धोरण सगळ्या जगासमोर ठेवलं आहे. काही पक्षांसाठी महिलांचं सशक्तीकरण हा राजकीय मुद्दा असू शकतो. मात्र भाजपा किंवा नरेंद्र मोदींसाठी महिला सशक्तीकरण आणि महिलांसाठीचं हे विधेयक हा राजकीय अजेंडा नाही.

## महत्त्वाचे...

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज ठाकरेंच्या निवासस्थानी

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यभरात गणेशोत्सवाचा जल्लोष आहे. घरोघरी गणपती बाप्पाचे आगमन झाले आहे. अनेक नेत्यांच्या घरी देखील गणपती विराजमान झाला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी देखील बाप्पाचे आगमन झाले आहे. राज ठाकरे यांच्या घरच्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी नुकतेच राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस सपत्नीक पोहोचले होते. त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शिवतीर्थावर हजेरी लावत राज ठाकरेंच्या घरच्या बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी राज ठाकरे व त्यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले. दरम्यान, गणेशोत्सवानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरातील शिवसेना नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार बांधव आणि मान्यवरांच्या घरी भेट देऊन श्री गणेशाचे मनोभावे दर्शन घेतले.

### रोहित पवार यांचा पुन्हा अजित पवारांवर हल्ला

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**मुंबई :** सत्ताधाऱ्यांसोबत न जाणाऱ्या पुरोगामी विचारसरणीच्या आमदारांवर विकास निधी वाटपात भेदभाव होत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. राज्याचे अर्थखाते उपमुख्यमंत्री अजित पवार याच्याकडे आहे. त्यामुळे एकप्रकारे त्यांनी त्यांच्यावरच निशाणा साधला आहे.रोहित पवार यांच्या नेतृत्वात बुधवारी पुण्यातील महात्मा फुले वाड्यात सरकारी कंत्राटी नोकरभरती विरोधात आंदोलन झाले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना रोहित पवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले की, ज्या आमदारांनी पुरोगामी भूमिका घेतली व जे सत्ताधाऱ्यांसोबत गेले नाहीत, त्यांच्यावर विकास निधीत अन्याय होत आहे. हा अन्याय तूर्त आम्ही सहन करू.

### शेफ विष्णू मनोहर करणार नवा विक्रम

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**मुंबई :** विक्रमवीर ख्यातनाम शेफ विष्णू मनोहर सलग 101 तास कुकींगचा नवा वर्ल्ड रेकॉर्ड करणार आहेत. अमेरिकेच्या सॅनफ्रान्सिस्को येथे ते हा विक्रम करतील. यासाठी लागणारी सामग्री ते जून 2024 च्या पहिल्या आठवड्यात अमेरिकेला पाठवणार आहेत.शाकाहाराचे महत्व वाढावे, मराठी रेसिपी अमेरिकनांसह परदेशींना कळाव्या यासाठी हा वर्ल्ड रेकॉर्ड अमेरिकन मराठी जनांना समर्पीत करण्यात येणार आहे. मिळणारा पैसा सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था व संघटनांना देण्यात येईल, अशी माहिती विष्णू मनोहर यांनी दिली.

## एकनाथ शिंदेंचे कार्यालय आता व्हॉटसअॅप चॅनलवर

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**मुंबई, ता.२१ :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यातील जनतेशी आता थेट व्हॉटसअॅपद्वारे कनेक्ट झाले आहेत. काल गणेश चतुर्थीच्या दिवशी मुख्यमंत्री सचिवालयाच्या 'सीएमओ महाराष्ट्र' या व्हॉटसअॅप चॅनलचा श्री गणेशा करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी घेतलेले निर्णय, मंत्रिमंडळाचे निर्णय, शासनाच्या योजना, विविध विकास प्रकल्प आदींची अचूक आणि अधिकृत माहिती या चॅनलच्या माध्यमातून आता थेट जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

जगभरात संवादाचे प्रभावी व उपयुक्त माध्यम ठरलेल्या 'व्हॉटसअॅप'ने चॅनलच्या माध्यमातून नवीन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिला असून त्यावर काल, मुख्यमंत्री सचिवालयाचे स्वतंत्र चॅनल सुरु करण्यात आले आहे. प्रमाणित असलेल्या या चॅनलला वापरकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून चॅनल सुरु केल्यानंतर काही वेळेतच ४० हजारांपेक्षा अधिक वापरकर्त्यांनी त्याला फॉलो केले आहे.राज्यात विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरु आहे. ही अंमलबजावणी करताना शासनाच्या योजना तसेच निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहोचल्यास त्यांना त्याचा लाभ घेता येईल, यासाठी लोकाभिमुख योजना, विकासप्रकल्पांची अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती, जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. 'हे सर्वसामान्यांचे सरकार' असल्याचे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी सदैव जनतेपर्यंत पोहोचण्यावर भर दिला आहे, स्मार्टफोनवर थेट मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयांची, शासकीय योजनांची माहिती मिळत असल्याने हा संवाद अधिक प्रभावी होणार आहे.मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनसंपर्क कक्षामार्फत जनतेला माहिती देण्यासाठी सध्या एक्स (ट्विटर), फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब, थ्रेडस, कू, टेलिग्राम आदी समाजमाध्यम तसेच इन्स्टन्ट मेसेजिंग अॅपचा वापर केला जातो.

## 'बहिणीचे कल्याण बघतील असे भाऊ प्रत्येक घरात असतातच असे नाही': सुप्रिया सुळे

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**मुंबई, ता.२१ :** ऐतिहासिक असे महिला आरक्षण विधेयक आज लोकसभेत बहुमताने मंजूर झाले. मात्र, त्यापूर्वी जवळपास 60 खासदारांनी या विधेयकावर आपले मत मांडले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही या विधेयकावर आपली मते मांडताना भाजपवर टीकास्त्र सोडले. मात्र, यादरम्यान त्यांनी केलेल्या एका वक्तव्याची चांगलीच चर्चा होत आहे. 'प्रत्येक बहिणीचे नशिब एवढे चांगले नसते की तिला आपले कल्याण बघणारा भाऊ मिळेल', असे वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केले. सुप्रिया सुळेंच्या या वक्तव्याचा संदर्भ आता अजितदादांच्या बंडाशी लावला जात आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले. मात्र, त्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत म्हणाले होते की, मणिपूरमधील कुकी महिलांच्या भल्यासाठी केवळ महिलांनीच बोलावं असे नाही. पुरुषही बोलू शकतात. आम्ही भाऊ म्हणून बोलू शकतो. याचा संदर्भ देत सुप्रिया सुळेंनी शहांना चांगलाच टोला लगावला. सुप्रिया सुळे म्हणाल्या, प्रत्येक घरात असे भाऊ असतातच असे नाही की जे बहिणीचे कल्याण बघतील. प्रत्येकाचे नशीब एवढे चांगले नसते.चंद्रकांत पाटील यांचे नाव न घेता सुप्रिया सुळे म्हणाल्या, भाजपच्या एकेकाळी प्रदेशाध्यक्ष असलेल्या नेत्याने मला ऑन कॅमेऱ्यावर घरी जाऊन जेवण बनवण्यास सांगितले.

## महिलांनी राजकारणात पुढे यावे ही भाजपची भूमिका-बावनकुळे

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**नागपूर, ता. २१ :** धनगर समाजाची विविध आंदोलने सुरू असून, त्यांच्या समस्या घेऊन प्रदेश चिटणीस नवनाथ पडळकर व राम वडकुते माझ्याकडे आले होते. धनगर समाजाच्या मागण्या व समस्या सरकारकडे पाठविल्या. तेवढाच त्या पत्राचा अर्थ असून त्यापेक्षा अधिक नाही, असे मत भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

कुणीतरी या पत्राचा वापर करून वातावरण खराब करीत आहेत, असा आरोप त्यांनी केला. ते नागपूर येथे माध्यमांशी बोलत होते.बावनकुळे यांनी दिलेल्या पत्राला सोशल मीडियावर प्रसारित करून त्याचा अपप्रचार सुरू असल्याचा प्रकार चुकीचा आहे, असे बावनकुळे म्हणाले. महिला आरक्षण विधेयकामुळे काँग्रेस बॅकफूटवर गेली आहे. त्यामुळे त्यांचे नेते काहीतरी बोलत सुटले आहेत. राज्यातील काँग्रेस नेत्यांमध्ये एकमेकांपेक्षा अधिक जलद कोण बोलू शकतो याविषयीच स्पर्धा लागली आहे. सुरुवातील कोण बोलते हे त्यांना काँग्रेसच्या दिल्ली दरबारी दाखवायचे आहे.

मध्यप्रदेशातील काँग्रेसचे नेते कमलनाथ यांचा मराठी मतदारांवर डोळा असून पांढुर्णा येथे छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा पुतळा बसवून त्याचे अनावरण आदित्य ठाकरेंच्या हस्ते करून ते केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. त्यापूर्वी त्यांनी त्यांच्याच लोकसभा मतदारसंघातील सौंसर येथील शिवाजी महाराजांचा पुतळा का पाडला यावर उत्तर द्यावे, असा प्रश्न केला. उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या कार्यकाळात जिल्हा नियोजन समितीचा निधी विरोधी पक्षातील आमदार व लोकप्रतिनिधींना मिळू नये असा अलिखित आदेश काढला होता. त्यांनी आकसापोटी राजकारण केले. आता ते लोक निधीवाटपावर बोलत आहेत. त्यांनी स्वत:कडे बघावे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूरचे पालकमंत्री आहेत, त्यांनी डीपीसीमधून एक हजार कोटींचा निधी दिला आहे. या विकासनिधीचा योग्य वापर व्हावा, विविध योजना राबविल्या जाव्या, अशी आमची भूमिका आहे. महिलांनी राजकारणात पुढे यावं ही भाजपची कायम भूमिका राहिली. त्यामुळेच भाजपामध्ये १५ लाखाहून अधिक महिला पदाधिकारी आहे. काँग्रेसने तब्बल १२ वेळा महिला आरक्षण कायदा संसदेतून परत पाठविला. काँग्रेस व उबाठा गटाकडे महिला नेतृत्त्व नाही. काँग्रेसने घराणेशाही केली आणि राष्ट्रवादी पक्ष ही सरदारांची फौज आहे. शरद पवार यांनी कुटुंबाशिवाय बाहेरच्या लोकांना मोठे होऊ दिले नाही. भाजपात सामान्य कार्यकर्ताही मोठा होतो.

## तुम्हाला वाटेल बच्चू कडू नाराज आहे, पण तसे काही नाही

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**सोलापूर, ता. २१ :** प्रहार संघटनेचे नेते तथा अपक्ष आमदार बच्चू कडू यांनी बुधवारी शेतकऱ्यांच्या मुद्यावरून पुन्हा एकदा सरकारवर निशाणा साधला. रोग, कीड, भाव पडले तरीही शेतकऱ्यांना मदत द्यावी लागते.

पण आमची सरकार दरबारी ही मदत बंद करून शेतमालाला रास्त भाव देण्याची मागणी आहे. हे तुमच्या बापाला जमत नसेल, तर उत्पादन खर्च कमी करा, असे कडू म्हणालेत.

सोलापुरात बुधवारी शासन दिव्यांग्यांच्या दारी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर बच्चू कडू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी महिला आरक्षणाच्या मुद्यावर आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच सरकारवरही निशाणा साधला. ते म्हणाले की, कायदा राजकारणी लोकांच्या हातचे बाहुले बनता कामा नये. कायद्याने राजकारणी बाहुले बनले पाहिजे. त्यानंतरच काहीतरी बदल होईल, अन्यथा ईडीची चौकशी केवळ एकाच पक्षावर होते, दुसऱ्या पक्षावर होतच नाही, असे घडते.

## कंत्राटी पद्धतीने भरतीच्या विरोधात आ.रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली लाक्षणिक उपोषण

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**पुणे, ता. २१ :** सरकारी कर्मचारी भरती टाळून त्याऐवजी कंत्राटी पद्धतीने भरती करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसकडून आक्रमक भूमिका घेत लाक्षणिक उपोषण करण्यात आले. सरकारी भरतीमध्ये गैरप्रकार होत आहेत. परीक्षा शुल्कच्या माध्यमातून सरकार विद्यार्थ्यांना लुबाडत आहे. शिक्षणाचे खासगीकरण, स्पर्धा परीक्षा, नोकर भरती, पेपर फुटी अशा घोटाळ्यानंतर सरकारी नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करण्यात येत आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केला. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुले वाडा येथे बुधवारी लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या लाक्षणिक उपोषणाला काँग्रेस, विद्यार्थी अभ्यासिका समिती आणि कष्टकरी युवक संघटनेने पाठिंबा दर्शविला. शहराध्यक्ष प्रशांत जगताप, युवक अध्यक्ष किशोर कांबळे, महिला शहराध्यक्षा मृणालिनी वाणी, युवती अध्यक्ष सुषमा सातपुते, गणेश नलावडे, अजिंक्य पालकर, दीपक कामठे, यांच्यासह अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कंत्राटी भरतीला राष्ट्रवादी काँग्रेसचा विरोध आहे. ठेकेदारांच्या फायद्यासाठी नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करण्यात येत आहे.

तलाठी भरती परीक्षेसाठी शुल्क आकारण्यात आले. मात्र पेपर फोडण्यात आले. त्यामुळे तलाठी भरतीचे शुल्क परत मिळाले पाहिजे. राजस्थान सरकारसारखा कायदा राज्य सरकारने केला पाहिजे आणि परीक्षा घोटाळ्यासंदर्भात समितीकडून चौकशी झाली पाहिजे, अशा मागण्यात रोहित पवार यांनी केल्या.

## "संजय राऊत हा सर्वात मोठा दलाल, त्याने आयुष्यभर.." राधाकृष्ण विखे पाटील

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**कोल्हापूर, ता. २१ :** संजय राऊत हा सर्वात मोठा दलाल आहे. मुंबईतल्या पत्राचाळ घोटाळ्यात मराठी माणसाची फसवणूक करुन कोट्यवधींची माया गोळा केली. कोव्हिडच्या काळात एका बाजूला लोक मृत्यूशी झुंजत होते, मात्र मेलेल्यांच्या टाळूवरचं लोणी खाण्यात ज्याने धन्यता मानली तो संजय राऊत आहे अशी टीका महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

माधव गडकरी हे ज्येष्ठ संपादक होते, ते आज हवे होते त्यांनी संजय राऊतचं कर्तृत्व कसं आहे ते सांगितलं असतं. आपल्याविरोधात लोकांनी ओरड करु नये आणि तक्रार करु नये म्हणून मुंबई उच्च न्यायालयात एका महिलेसंबंधीचं प्रकरण सुरु आहे. असे लोक माझ्यावर जर आरोप करत असतील तर मला काही फरक पडत नाही. आयुष्यभर ज्यांनी दलाली केली त्यांनी दुसऱ्यावर कशाला बोलायचं? अशा लोकांच्या वक्तव्याला प्रसिद्धी मिळते हेच आश्चर्यकारक आहे. हे सगळं माझ्या बदनामीचं षडयंत्र आहे असंही राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. संगमनेरमध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. त्याबाबत विचारलं असता संजय राऊत हा सर्वात मोठा दलाल आहे त्याने आयुष्यभर दलालीच केली आहे.

## "...हा ओबीसी समाजाचा अपमान आहे"-राहुल गांधी

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**नवी दिल्ली, ता.२१ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी लोकसभेत महिला आरक्षण विधेयक मांडलं. या विधेयकावर आज लोकसभेत चर्चा केली जात आहे. दरम्यान, सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांकडून आपापली भूमिका मांडली जात आहे. यावेळी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनीही महिला आरक्षण विधेयकावर आपली भूमिका स्पष्ट केली. महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर मंजूर करून ते लागू करावं, अशी मागणी राहुल गांधींनी केली.

ओबीसी समाजाची देशातील सत्तेत असलेल्या अल्प भागीदारीवरून राहुल गांधींनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. लोकसभेत राहुल गांधी म्हणाले, "भारतात एकूण ९० सचिव आहेत. जे भारताचं सरकार चालवतात आणि अर्थसंकल्प नियंत्रित करतात. त्यामध्ये ओबीसी समुदायाचे लोक किती आहेत? असा प्रश्न मी विचारला. यावर मीच उत्तर देऊ इच्छितो, भारतातील ९० पैकी केवळ ३ सचिव ओबीसी समुदायाचे आहेत. हे ओबीसी सचिव भारताचा केवळ पाच टक्के अर्थसंकल्प नियंत्रित करतात. म्हणजे भारताचा अर्थसंकल्प ४४ लाख कोटींचा असेल तर केवळ २.४७ लाख कोटी म्हणजेच ५ टक्के अर्थसंकल्प यांच्या नियंत्रणात आहे."

### महिलांचा सहभाग असलेले कार्यक्रम घेतले जातील

## राष्ट्रीय स्वयंसवेक संघाकडूनही 'पुरुषप्रधान' शिक्का पुसण्याचा प्रयत्न

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**नवी दिल्ली, ता.२१ :** भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारने संसद आणि विधिमंडळात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठीचे विधेयक लोकसभेत सादर केले. तत्पूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मात्र वर्षभरापूर्वीच संघटनेत आणि समाजातील इतर क्षेत्रात स्त्रियांचे प्रतिनिधित्व वाढविण्यासंदर्भात पावले उचलायला सुरुवात केली होती. सामाजिक आणि राजकीय तसेच निवडणुकीच्या राजकारणात महिलांचा सहभाग वाढत जात असताना संघावर मात्र पुरुष प्रधानतेचा ठपका ठेवण्यात येत होता. त्यामुळे संघाकडूनही महिलांच्या नेतृत्वाला अधोरेखित करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

ऑक्टोबर २०२२ साली विजयादशमीनिमित्त आयोजित केलेल्या सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले की, महिला जे करू शकतात ती सर्व कामे पुरुष करू शकत नाहीत. जर संपूर्ण समाज आपल्याला जोडायचा असेल तर त्यात ५० टक्के मातृशक्ती असली पाहीजे. त्यांना दुर्लक्षित करून चालणार नाही. आम्ही एकतर त्यांना देवघरापुरते मर्यादीत ठेवले किंवा त्यांना दुय्यम दर्जा दिला आणि घरातच डांबून ठेवले.

यातून आता पुढे जायला हवे. आपण महिलांना सार्वजनिक क्षेत्रात समान अधिकार द्यायला हवेत. तसेच त्यांना त्यांचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देऊन अधिक सक्रिय करणे आवश्यक आहे.संघाच्या २०२२ सालच्या विजयादशमीच्या सोहळ्यासाठी गिर्यारोहक, भारत-तिबेट सीमेवरील माजी महिला पोलिस अधिकारी, पद्मश्री संतोष यादव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. संघाच्या कार्यक्रमात महिला प्रमुख पाहुणी म्हणून उपस्थित राहणे, हे अभावानेच दिसत होते.

तसेच नागपूर येथील मुख्यालयात होणाऱ्या विजयादशमी सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून येणाऱ्या संतोष यादव या पहिल्याच महिला ठरल्या. त्याचबरोबर याचवर्षी हरियाणा येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या बैठकीत संघाने जाहीर केले की, संघात महिलांचा सहभाग यापुढे वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

हरियाणा येथे झालेल्या सभेत संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसबाळे म्हणाले की, कुटुंब प्रबोधिनी, सेवा विभाग आणि प्रचार विभाग असे संघाचे अनेक कार्यक्रम महिलांच्या सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाहीत. या बैठकीत आम्ही ठरविले आहे की, गृहस्थ स्वयंसेवक (लग्न झालेले) यांच्यामार्फत दर तीन महिन्यांनी ग्रामीण आणि शहरी भागात कुटुंब शाखा आयोजित केली जाईल आणि महिलांचा सहभाग असलेले विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातील.

## पीओकेवर नजर

पाकव्याप्त काश्मीर लवकरच आपोआप भारतात येईल, थोडी प्रतीक्षा करा असे विधान केंद्रीय मंत्री व माजी लष्करप्रमुख व्ही. के. सिंग यांनी राजस्थानात भाजपच्या परिवर्तन संकल्प यात्रेवेळी एका प्रश्नावर केल्याने स्वाभाविकपणे खळबळ माजली आहे.

पाकव्याप्त काश्मीरच्या सामीलीकरणाचा विषय त्यामुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आपल्याला आठवत असेल, 'सरकारने आदेश दिल्यास पाकव्याप्त काश्मीर परत मिळवण्यास भारतीय लष्कर सज्ज आहे' असे विधान लष्कराच्या उत्तरी कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मागे केले होते, तेव्हाही पाकव्याप्त काश्मीरचा प्रश्न असाच ऐरणीवर आला होता. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी पाकव्याप्त काश्मीर पुन्हा भारतात सामील करण्यासंबंधीचा ठराव पूर्वीच संमत केलेला आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी 'जम्मू काश्मीर असे आम्ही म्हणतो तेव्हा त्यात काश्मीरचा पाकव्याप्त भागही अंतर्भूत असतो' असेही संसदेत ठणकावून सांगितले होते. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी देखील पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तान सरकारने अत्याचार चालवले असून, गिलगिट – बाल्टिस्तान परत मिळवल्याशिवाय भारत स्वस्थ बसणार नाही असे खणखणीत विधान त्यांच्या काश्मीर दौऱ्यामध्ये केले होते. काश्मीरमधील लष्कराच्या चिनार कॉर्प्सच्या ले. जनरल ए. डी. एस. औजला यांनीही लष्कराची तशी तयारी असल्याचे म्हटले होते. ही सगळी आजवरची वक्तव्ये मोदी सरकारच्या मनातील एका सुप्त आकांक्षेकडेच निर्देश करतात. अखंड भारत हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेहमीच स्वप्न राहिले आहे. ज्याला पाकव्याप्त काश्मीर म्हटले जाते त्याचे दोन्ही भाग, म्हणजे आझाद काश्मीर आणि गिलगीट बाल्टिस्तान मिळून भारताच्या नकाशाचे मस्तक बनलेले आहे हे आपण आधी लक्षात घ्यायला हवे. भारतमातेचे ते मस्तक तिला सन्मानाने पुन्हा मिळवून दिले पाहिजे ही प्रत्येक राष्ट्रभक्ताची आस आहे आणि त्यात काहीही वावगे नाही. दुसरीकडे पाकव्याप्त काश्मीरमधील जनताच तेथील सरकारला विटलेली आहे. महागाईचा उसळलेला आगडोंब, 33 टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचलेली बेकारी, नोकरी व्यवसायाच्या संधींचा पूर्ण अभाव आणि वर पोलिसांची दडपशाही ह्या सगळ्याला उबगलेले पाकव्याप्त काश्मीरमधील लोक भारताच्या प्रगतीकडे डोळे विस्फारून पाहत बसले आहेत. कारगीलमध्ये हिंडताना सीमेपलीकडील जनतेच्या ह्या प्रतिक्रिया सर्रास कानी पडत असतात. पाकिस्तानात कुजत पडण्यापेक्षा भारतात सामील होणे चांगले अशी तेथील शिया जनतेची भावना बनलेली आहे. आझादीचे नारे देत तेथील जनता सातत्याने उठाव करीत आलेली आहे. त्या उठावांना दडपण्यासाठी प्रचंड प्रमाणात अत्याचार तर तेथे होत आहेतच, शिवाय तेथील मूळच्या शियाबहुल भागांमध्ये सुन्नी मुसलमानांच्या वस्त्या निर्माण करून पाकिस्तान सरकार तेथील भौगोलिक स्थितीमध्ये बदल घडवण्याच्या प्रयत्नात सतत असते. शियांविरुद्ध अत्याचार आणि दडपशाहीचे सत्र सातत्याने अवलंबिले जात आले आहे. त्यामुळे जनरल व्ही. के. सिंग जेव्हा पाकव्याप्त काश्मीरसंदर्भात आक्रमक वक्तव्य करतात तेव्हा ते नुसते वरवरचे विधान उरत नाही. त्याला ह्या सगळ्या पार्श्वभूमीमुळे एक गहन अर्थ प्राप्त होतो. भारताने पाकव्याप्त काश्मीरची भूमी भले गमावली असली तरी कागदोपत्री मात्र अजूनही तो भारताचाच भाग मानत आला आहे. जम्मू काश्मीर विधानसभेतही पाकव्याप्त काश्मीरसाठी जागा मोकळ्या सोडलेल्या आहेत. पाकिस्तानसंदर्भातील मोदी सरकारची आक्रमक नीती लक्षात घेता पाकव्याप्त काश्मीरसंदर्भात सरकार बोटचेपी भूमिका स्वीकारणार नाही हेही तेवढेच खरे आहे. त्यामुळेच सरकारमधील एखादी जबाबदार व्यक्ती जेव्हा पाकव्याप्त काश्मीरसंदर्भात असे वक्तव्य करते तेव्हा त्याला जागतिक पातळीवर महत्त्व आल्याखेरीज राहत नाही. पाकिस्तान हे मुळात एकसंध राष्ट्र नाही. पंजाब, सिंध, खैबर – पख्तुनख्वा, गिलगीट – बाल्टिस्तान, बलुचिस्तान आणि व्याप्त काश्मीर अशा भिन्न संस्कृतीच्या, भिन्न भौगोलिक परिस्थितीच्या भागांनी ते बनलेले आहे. साहजिकच उपेक्षित राहिलेल्या भागांमध्ये पाकिस्तानपासून फुटून निघण्याचे, आझादीचे सूर निघतच असतात. बलुचिस्तानमध्येही स्वातंत्र्याचे वारे मध्यंतरी जोरात वाहत होते आणि भारत तेथील फुटिरतावादाला खतपाणी घालत असल्याचे अकांडतांडव पाकिस्तानने चालवले होते. मोदी सरकारने मनात आणले तर काहीही घडू शकते हे आजवर अनेकदा प्रत्ययास आलेले आहे. शिवाय लोकसभेची निवडणूकही तोंडावर आहे. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरसंदर्भात सरकारने उद्या आक्रमक भूमिका स्वीकारली आणि भारताचा नकाशा पुनर्स्थापित करण्याचा विडा उचलला, तर काय ह्या भीतीने पाकिस्तान धास्तावला आहे यात नवल नाही.

# दगड धानोरा येथे रुजवीली एक गाव एक गणपती संकल्पना

## पोलीस बंदोबस्त नाकारणारे ठरले पाहिले गाव

पब्लिक पोस्ट । राजेश धोटे



**नेर :** तालुक्यातील दगड धानोरा येथे "एक गाव" "एक गणपती" या संकल्पनेनुसार गावात एकच सार्वजनिक गणेश मंडळ आहे. सदर गणेशोत्सव हा नवयुवक गणेश मंडळ दगडधानोरा यांच्याकडून सार्वजनिक रित्या बसविण्यात येतो , गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि पोलीस पाटील यांनी यावर्षीचा गणेश उत्सव पोलीस बंदोबस्ता विना, स्वयंशिस्तीमध्ये साजरा करण्याबाबत नेर पोलीस स्टेशनला निवेदन देऊन पोलीस बंदोबस्त नाकारलेला आहे. दिनाक 10 सप्टेंबर रोजी पोलीस स्टेशन नेर येथे आयोजित पोलीस पाटील यांच्या सभेमध्ये सर्व गावांच्या पोलीस पाटलांना विना पोलीस बंदोबस्त आगामी सर्व सन, उत्सव साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद म्हणून दगडधानोरा येथील पोलीस पाटील मनोज ठाकरे यांच्या सहकार्याने तसेच नवयुवक गणेश उत्सव मंडळ दगड धानोरा यांचे अध्यक्ष गणेश राजेंद्र गव्हाणे , उपाध्यक्ष चंद्रशेखर अशोकराव शेळके, मनोज जाधव, निलेश गुल्हाने, सागर महल्ले, नंदू वारुळकर, चेतन खाडे, तुषार ठाकरे, अभय चव्हाण यांच्या पुढाकाराने. यावर्षी दगड धानोरा येथील गणेश उत्सव विना पोलीस बंदोबस्तात साजरा करण्याचे नवयुवक गणेश उत्सव मंडळ आणि दगड धानोरा येथील गावकऱ्यांनी यांनी ठरविले. त्यांच्या या निर्णयांचं चौफेर स्वागत होत आहे. तसेच इतरही गावांच्या गावकऱ्यांनी व पोलीस पाटलांनी असे धडाकेबाज पाऊल उचलावे अशी सूचनावजा विनंती ठाणेदार बाळासाहेब नाईक यांनी केली आहे.


# राजाभाऊ इंगोले व सचिन खंडारे राज्य कार्यकारिणीवर

पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी




**यवतमाळ :** येथील लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ इंगोले व कोषाध्यक्ष सचिन खंडारे यांच्य यवतमाळ जिल्ह्याच्य सामाजिक चळवळीमध्ये मातंग समाज कार्याची दखल घेत लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीवर निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीमध्ये अग्रणी व कर्तुत्व संपन्न असलेल्या लढाऊ सामाजिक संघटना लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे व प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी राजाभाऊ इंगोले व सचिन खंडारे यांना राज्य कार्यकारणी समितीवर नियुक्ती करून त्यांना पुढील वाटचालीसाठी व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देऊन प्रोत्साहित केले. या निमित्ताने यवतमाळ शहराध्यक्ष अनिल इंगोले व पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार शासकीय विश्रामगृह यवतमाळ येथे असंख्य समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला या सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष ज्येष्ठ सल्लागार ज्ञानेश्वर खंडारे होते जिल्हाउपाध्यक्ष सागर झोंबाडे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष दीपाताई झोंबाडे, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष पल्लवीताई इंगोले, शहर उपाध्यक्ष संजय वानखडे, बाभूळगाव तालुकाध्यक्ष सुरेंद्र गायकवाड, उपाध्यक्ष किशोर नंदपटेल, जिल्हा सचिव दिनेश खडसे, लेखक राजू इंगोले, किसन शेळके, महादेव कांबळे, विजय घोडे, महिला आघाडीच्या अर्चनाताई घोडे, मंदाताई इंगोले, पपीताताई कांबळे, वानखडे ताई, विद्यार्थी आघाडीच्या बिट्टू झुंबाडे, मोना इंगोले, दिशा वानखडे, वैष्णवी कांबळे, शिवम कांबळे, प्रफुल्ल गवळी, आदित्य घोडे तसेच सुनील इंगोले, संतोष ससाने,सचिन लोंढे, शंकर वानखडे, इत्यादी असंख्य समाज बांधव या सत्कार सोहळ्याला उपस्थित होते. या सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन भूराजी तायडे यांनी केले तर राजू गवळी यांनी आभार मानले.

## मनोज नाल्हे यांना पितृशोक



पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी

**नेरपरसोपंत :** शिवसेना नेर तालुकाप्रमुख, व माणिकवाडा गावचे माजी सरपंच मनोज नाल्हे यांचे वडील उद्धवराव नाल्हे गुरूजी यांचे वृद्धापकाळाने वयाच्या 82 व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. त्यांचे मागे दोन मुले नातवंड व बराच आप्तपरिवार आहे. अंत्यविधी उद्या बुधवार दी.20/9/23 ला सकाळी १२ वाजता त्यांचे राहते घर माणिकवाडा येथून निघेल.



# आश्रमशाळा शिक्षकांचा क्षमता चाचणीवर बहिष्कार

पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी

**पांढरकवडा :** दिनांक१७ सप्टेंबर २०२३ ला जगदंबा माता संस्थान केळापूर येथे आदिवासी विभागाच्या शासकीय/अनुदानित आश्रम शाळा शिक्षक,कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून क्षमता चाचणी परीक्षेवर बहिष्कार टाकून निषेध सभा घेण्यात आली या सभेसाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा अंतर्गत २८अनुदानित आश्रम शाळेतील शिक्षकवृंद बहुसंख्येने उपस्थित होते याप्रसंगी पांढरकवडा प्रकल्प कार्यकारिणीचे सचिव .शंकर माने सर,प्राथमिक मुख्याध्यापक संघटनेचे उपाध्यक्ष. .गणोरकर सर,आशिक संघाचे पांढरकवडा अध्यक्ष शिम्ब्रे सर ,पांढरकवडा प्रकल्प उपाध्यक्षा श्रीमती राजुरकर मॅडम,.बोडेवार सर,.गौरकर सर,.बायस्कर सर आदी शिक्षकवृंदांनी मनोगतातून शासनाच्या अन्यायकारक परीपत्रकाचा तसेच क्षमता चाचणी परीक्षेचा खरपूस समाचार घेऊन निषेध व्यक्त केला व क्षमता चाचणी परीक्षेवर शिक्षकांचा १००% बहिष्कार यशस्वी केला सदर निषेध सभेला प्रकल्पातील प्राथमिक व माध्यमिक मुख्याध्यापक .पाटील सर व .बायस्कर सर, आकोली. वरठे सर,. राठोड सर,खैरगांव कासार.चव्हाण सर,पहापळ.टेकाम सर,जरूर.वानखेडे सर,वांजरी.शिंदे सर,सावरखेड .आत्राम सर, उमरी. दासपतवार सर,पाटण साखरकर सर,वाघोली व अनुदानित शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सभेला आवर्जून उपस्थित होते, सरते शेवटी . कोंडापलकुलवार सर यांनी उपस्थितांचे आभार मानून निषेध सभेची सांगता करण्यात आली.

# दुचाकी व मोबाईल चोरट्याना पोलीसांनी केले गजाआड

पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी

**यवतमाळ :** शहरातील दुचाकी व मोबाईल चोरून नेणाऱ्या चोरट्याना आर्णी पोलीस पथकाने सापळा रचुन टोळीला गजाआड केले.आरोपी जीवन कवडू चव्हाण वय 32 व रा. शकलगाव लखन किसन राठोड वय 31 वर्ष रा. म्हसोला पोलीस ठाणे आर्णि यांना सदर गुन्ह्यात अटक करून त्यांच्याकडून कलम 457 380 भादवी मध्ये - एक मोटर सायकल हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक Mh29DC 5847 किंमत 30,000 रुपये , एक मोटर सायकल हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक Mh 29 AH 2873 किंमत 15,000 रुपये पोलीस ठाणे यवतमाळ ग्रामीण येथील मध्ये एक नवीन मोटरसायकल होंडा शाईन क्रमांकMH 29 CA 6174 किंमत 1,02,676 रुपये ,20 नग अँड्रॉइड मोबाईल प्रत्येकी किमती 10 हजार रुपये व 2 कीपॅड मोबाईल प्रत्येकी किमती 1000 रुपये असे एकूण 22 मोबाईल एकूण किमती 2,0,2000 रुपये असा एकूण 3,49,676 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला आहे. आरोपी घरफोडी करून घरातील मोबाईल चोरून घेऊन जातात व घरातील व्हरांड्यात असलेली मोटरसायकल सुद्धा चोरून नेतात अशी त्यांची मोडस आहे. पोलीस ठाणे आर्णी आणि यवतमाळ ग्रामीण ला त्यांनी याच मोडसने घरफोड्या केले असून अशा प्रकारच्या मोडसने इतर पोलीस ठाण्यात घरफोड्या झालेल्या असल्यास त्यांनी आपल्या गुन्ह्यात सदर आरोपींना अटक करण्याची कार्यवाही करण्यात आ

# ढाणकी शहरात गणरायाचे जल्लोशात आगमन

पब्लिक पोस्ट । प्रवीण जोशी



**ढाणकी :** बुद्धीची देवता आणि लहान चिमुकल्यांचा बाप्पा अशी ओळख गजानन श्री गणेशाची आहे आणि ते प्रत्येकाचे आराध्य दैवत. गणरायाची स्थापना शहरात अनेक मंडळांनी केली आहे त्यामुळे सर्वत्र आनंदाच व चैतन्याचे व जल्लोशाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणरायाच्या आगमनाची दि 19 सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळपासूनच भक्तामध्ये भक्तीमय धामधुम सुरू होती.

आपल्या श्री गणेशाच्या आगमनाचे जंगी स्वागत करण्यासाठी गणेश मंडळांनी जय्यत तयारी केली असून स्थापनेपूर्वी शहरातून ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढून गणरायाचे जल्लोशात आणि भक्तीभावाने तरुणांच्या व लहान चिमुकल्यांनी स्थापन केलेल्या मंडळांनी स्वागत केले. पुढचे दहा दिवस सार्वजनिक गणेश मंडळाकडून कडून मुर्ती स्थापनेच्या ठिकाणी अनेक धार्मिक कार्यक्रम गणेश मंडळा समोर होणार असून यातून नक्कीच समाज प्रबोधन होईल तसेच आरतीच्या ताला सुरामुळे सभोवतालचे वातावरण भक्तीमय व अपार श्रध्देत नाहून निघणार आहे.

जुने बस स्थानक परिसर व स्टेट बँकेच्या परिसरात अनेक गाव खेड्यातील तरुणांनी गणरायाला लागणारे पूजेचे साहित्य विक्रीसाठी आणले होते त्यामुळे बाजारपेठेत सुद्धा मोठ्या प्रमाणात गर्दी बघायला मिळाली आणि पालकासोबत बालगोपालांनी सुद्धा हार,आणि इतर सजावटीच्या साहित्यासाठी आपल्या पालकाकडे हट्ट धरल्याचे बघायला मिळाले आनंदाचे वातावरण होते शिवाय बाजारात मोठया साधारण व लहान श्री गणरायाच्या मुर्तीची खरेदी करतांना गणेशभक्तांची गर्दी उसळली होती तर मंडपवाले ,मुर्तीकार व संबंधीत इतर व्यवसायीकांच्या धंदयात मोठी वाढ झाली असेल १० दिवसाच्या गणरायाच्या मुक्कामात सार्वजनिक गणेश मंडळाकडून विविध सामाजीक उपक्रमासह सांस्कृतीक कार्यक्रमाची मेजवाणी ढाणकी करांना ऐकावयास व पाहण्यास मिळणार आहे. गणरायाचे आगमण पहिल्या दिवशी अगदी थाटामाटात ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत शहराच्या मुख्य रस्त्याने मिरवणूक काढत जल्लोशात भक्ताकडून श्रध्दा पूर्वक जंगी स्वागत होताना बघायला मिळाले.

पोलीसांचा फौजफाटा ठिकठिकाणी तैनात,आगामी काळात गणेशउत्सव स्थापनेपासून पुढील १० दिवस गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढाणकी शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे.काही गुन्हेगारावर पोलीस स्टेशनच्या हद्दीबाहेर जाण्याच्या नोटीसा बजावल्या तर अनेक जणांवर प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. गणेशभक्तांना आरती व इतर सांस्कृतीक कार्यक्रमाला भयमुक्त वातारणात बाहेर पडूण हजेरी लावता यावी म्हणून ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला आहे.ठाणेदार सुजाता बन्सोड,पोलीस उपनिरीक्षक शिवाजी टीपूर्णे हे शहरातील हालचालीवर बारकाईचे लक्ष ठेवीत आहेत.

## पब्लिक पोस्ट



### रानभरारी

गझल

आपल्याही काळजाच्या आत नांदू लागते ..
धर्म नांदू लागते अन् ,जात नांदू लागते ..

सभ्यते ची पातळी ओलांडल्या नंतर इथे..
सभ्यता सगळीकडे स्वस्तात नांदू लागते ..

पांढरा, पिवळा, निळा, हिरवा असो वा केशरी..
निरनिराळे धर्म मग रंगात नांदू लागते..

योजना दिसतात जातांना पुढा-यांच्या गळी..
कर बळीचे येथल्या, कर्जात नांदू लागते..

नांदते सोबत सुखाने पाप ह्या धरतीवरी..
पुण्य तर नंतर पुढे स्वर्गात नांदू लागते..

पेरणीपुर्वीच माती रक्त अमुचे मागते..
पांढरा कापूस मग 'भरकात' नांदू लागते..

याचसाठी वाटते कौतूक सर्वांना तिचे..
एक परकी स्पोरगी सगळ्यातर नांदू लागते..

जयकुमार वानखेडे,जवळा.

## पब्लिक पोस्ट

संयोजक जयकुमार वानखेडे 7775875877



### पालवी

लेखणी देखणी

माझी लेखणी देखणी
असे मला शस्त्रापरी
मनातील भाव माझ्या
दुजा चित्तात उतारी

माझी लेखणी देखणी
असे मोरपिसासम
हळू फिरते हृदयी
सर्व विसरती तम

माझी लेखणी देखणी
जशा पावसाच्या सरी
आठवांचा पर्जन्य तो
चिंब चिंब मन करी

माझी लेखणी देखणी
कधी होई ज्ञानी गुरू
कान पिळी वाट देई
चुकतांना वाटसरू

माझी लेखणी देखणी
तिने लाविला रे लळा
आता मिळे समाधान
भाव लिहूनिया भोळा

सौ सरला कापसे
देवळी

AMARON
स्थानांतरण
कटारिया बॅटरी
स्टेट बँक चौक,यवतमाळ येथुन
नवजीवन मंगल कार्यालयाच्या समोर
धामणगाव रोड, यवतमाळ.
येथे स्थानांतरीत झाले आहे.
सर्व ग्राहक आणि डीलर्स पुढील सेवेकरिता वरील पत्यावर संपर्क करावा.
मो. 9518577784 / 9372881311

हे वृत्तपत्र,मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अंकुश गोंविदराव वाकडे यांनी साफुआ प्रिंटर्स, माधव नगर,प्लॉट नं.६२ वाघापूर, यवतमाळ -४४५००१ येथे छापून येथेच प्रकाशीत केले आहे. फोन नं. ०७२३२-२५२१२३, RNI : MAHMAR२०२१/८२५००
(वृत्तपत्रातील प्रकाशित मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद यवतमाळ न्यायालयाअंतर्गत ) संपादक/व्यवस्थापक विजय मालखेडे ९०७५८९०८९५
हिंदी - यह अखबार मालीक, प्रकाशक, मुद्रक एवम संपादक अंकुश गोंविदराव वाकडे व्दारा साफुआ प्रिंटर्स, माधव नगर,प्लॉट नं.62 वाघापूर, यवतमाल -445001 से मुद्रीत कर यही से प्रकाशित किया गया है. फोन नं. 07232-252123, RNI : MAHMAR2021/8250
(अखबार मे प्रकाशित विचारो से संपादक सहमत हो यह जरुरी नही. सभी विवाद यवतमाल न्यायालय के तहत.)संपादक/व्यवस्थापक विजय मालखेडे ९०७५८९०८९५

दैं. पब्लिक पोस्ट

विदर्भ BLAST

◢ अमरावती ◢ अकोला ◢ वाशिम ◢ बुलडाणा

BRAND LATEST ANCHOR SUPER TEJ

यवतमाळ,गुरूवार
२१ सप्टेंबर २०२३

## २३ सप्टेंबरला दिवस-रात्र समान; पृथ्वीचे दोन्ही गोलार्ध शनिवारी सूर्यापासून समान अंतरावर



पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अमरावती :** दरवर्षी २२ किंवा २३ सप्टेंबरला दिवस व रात्र प्रत्येकी १२ तासांचे म्हणजेच राहतात. या विशेष तारखांना खगोल शास्त्रात विषुवदिन म्हणतात. या दिवशी पृथ्वीचे दोन्ही गोलार्ध शनिवारी सूर्यापासून समान अंतरावर राहतात. या शिवाय अन्य दिवशी नेहमीपेक्षा लहान-मोठे राहत असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली.

दिवस व रात्रीची असमानता पृथ्वीच्या आसाच्या कलन्यामुळे होते. पृथ्वीचा अक्ष हा २३.५ अंशाने कललेला आहे. जो गोलार्ध सूर्याकडे कलतो, त्या गोलार्धात दिवस १२ तासांपेक्षा मोठा व रात्र १२ तासांपेक्षा लहान असते. जेव्हा कोणताही गोलार्ध सूर्याकडे कललेला नसतो, तेव्हा पृथ्वीवर दिवस व रात्र समान असते, पृथ्वीच्या परांचल गतीमुळे या दिवसाला दरवर्षात थोडाफार फरक पडू शकत असल्याचे त्यांनी सांगितले. २१ मार्च, २२ किंवा २३ सप्टेंबर या दिवशी पृथ्वीचे दोन्ही गोलार्ध सूर्यापासून समान अंतरावर असतात.

## शेतात विष पिऊन शेतकऱ्यानं संपवलं जीवन



पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**देवळी (वर्धा) :** सततचा पाऊस, त्यानंतर पिकांवर आलेल्या रोगामुळे लावलेला पैसाही निघेल की नाही, या विवंचनेत असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्याने शेतातील पिकांची अवस्था पाहून शेतातच विष गटकले. यातच त्याचा मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना रत्नापूर येथे मंगळवारी दुपारी २ वाजता उघडकीस आली. दिनेश नानाजी मडावी (३८) रा. रत्नापूर, असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मृत व त्यांचे दोन भाऊ यांच्याकडे वडिलोपार्जित ३ हेक्टर ५४ आर शेती असून, त्यावर बँक ऑफ इंडिया भिडी शाखेचे एक लाखाचे कर्ज आहे. दोन महिन्यांपूर्वी वडिलांचा मृत्यू झाल्याने ही शेती तिघा भावांत विभागली गेली. त्यामुळे मृताच्या नावे पावणेतीन एकर शेती आली असून, त्यामध्ये सोयाबीन व कपाशीची लागवड केली. या पिकाची अवस्था वाईट असून लागवडीकरिता पैसा नाही. बँकही नव्याने कर्ज द्यायला तयार नाही, यामुळे विवंचनेत असलेल्या दिनेशने मंगळवारी सकाळी शेतात जाऊन विष प्राशन करून आत्महत्या केली.

# गावातील स्थानिक लोकांचे येणा-या निवडणुकीत बहिष्कार

## पेसा अनुसूचित ग्रामपंचायत परसोडा

### तेलंगणा - महाराष्ट्र सिमेवरील परसोडा चुनखडी लिज क्षेत्र

पब्लिक पोस्ट, विशेष प्रतिनिधि,




**घुग्घुस :** चंद्रपुर जिल्हा तालूका कोरपना, दि.01/03/2023 व दि.24/08/2023 ला दोनदा Rccpl सिमेंट कंपनी चे परसोडा चुनखडी लिज क्षेत्र कायमस्वरूपी रद्द करण्याबाबत ठराव मंजूर करून जिल्हाधिकारी,व खनी कर्म अधिकारी चंद्रपूरला पाठविले आहे तरी अद्याप कोणत्याही प्रकारची कंपनी वर जिल्हा प्रशासन कार्यवाही करताना दिसत नाहीत. ग्रामपंचायत ने कंपनी ला वर्किंग काम बंद करण्यासाठी आदेश दिले असताना कंपनी त्याच उल्लंघन करत जबरदस्ती उत्खनन व गाव रस्ता वर अवजड वाहतूक करून गाव रस्ता ला पांदण स्वरूप आणले आहे, कंपनीने पर्यावरण नियमांचे उल्लंघन करत उत्खनन व वाहतूक करत आहे . पर्यावरण विभाग चुपचाप बघत आहे, ह्या वरून जिल्हा प्रशासन विभाग अधिकारी व कंपनी चे साटेलोटे आहे का असा प्रश्न उपस्थित होतो आहे. दि.06/09/2023 ला प्रकल्प ग्रस्त शेतकरी ना वेळेवर नोटीस दिल्याबद्दल प्रकल्प ग्रस्त व ग्रामपंचायत ने ती सभा पुढे घेण्यात यावे यासाठी तहसीलदार कोरपना ह्यांना ग्रामपंचायत कडून पत्र दिले असताना, सुद्धा उपविभागीय अधिकारी राजूरा ह्यांनी कंपनी हितासाठी प्रकल्पग्रस्त व ग्रामपंचायत अनुपस्थितीत आढावा सभा घेऊन कंपनी ला काम चालू करण्यासाठी अनुमती दिली आहे, हे प्रशासन अधिकारी कंपनी ला अप्रत्यक्षपणे सहकार्य करत, पेसा अनुसूचित ग्रामपंचायत अधिकार क्षेत्र ला केराची टोपली दाखवत आहे , परसोडा गाव रस्ता 10 फुटाचा,कंपनी अवघड वाहतूक मुळे पांदन स्वरूपाचे झाले आहे. ग्रामपंचायत वर अन्याय होत असताना निर्वाचित जनप्रतिनिधी बघ्याची भूमिका घेत आहेत. म्हणून सर्व गावकरी ने ठरवले कि, येणाऱ्या निवडणुकीत लिज क्षेत्रातील संपूर्ण गावातून निवडणूकावर बहिष्कार घालण्यात येणार आहे, कंपनी ने ग्रामपंचायत व स्थानिक लोकांना फसवणूक केली प्रकरणी, प्रशासन व पोलिस प्रशासन कंपनी वर गुन्हा दाखल न करता उलट कंपनी हितासाठी, प्रकल्पग्रस्तावर कंपनी व पोलिस प्रशासन कडून प्रकल्पग्रस्तावर खोटं गुन्हा दाखल केला जातो आहे. महाराष्ट्र तेलंगणा सिमावरील गावावर प्रशासन अधिकारी व पोलिस प्रशासन कडून अन्याय केला जातो आहे, अंध शासन व भ्रष्ट प्रशासन अधिकारी बघ्याची भूमिका घेत आहेत, म्हणून येणाऱ्या निवडणुकीत लिज क्षेत्रातील संपूर्ण गावांमधून बहिष्कार घालण्यात येईल असे संतप्त प्रतिक्रिया अरुण मैदमवार, सामाजिक कार्यकर्ता, गंगाधर कुंठावार, सखाराम जी तलांडे, नेमीचंद काटकर, कार्तिक गोनलावार, आकाश कुंठावार, श्रीनिवास अपकमवार, नितेश कोटनाके, रामचंद्र सिडाम, राहुल खाडे, विनोद सिगुरलावार, बालकुमार कांबळे, लोहकरे गुरूजी, निर्मला ताई भिमराव कोरांगे, देविदास पेंदोर,इ.नी ह्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

## मनोज धकाते गुन्हे शोध पथक या डिबी पोलीसाची पत्रकार सोबत अरेरावी,व इतर माफिया सोबत साटेलोटे?



पब्लिक पोस्ट नौशाद शेख,

**घुग्घुस :** येथील घुग्घुस पोलीस स्टेशनमध्ये एक आरोपीला कोर्टामध्ये हजर केले असतांना न्यायालयाकडून दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली, सदर आरोपी घुग्घुस पोलीस स्टेशन मधील लॉकअप रूम मध्ये दाखल असतांना त्या आरोपीला इतर नातेवाईका कडून तसेच शहरातील माफियातर्फे भेट व इतर सामग्री देण्यात करीता मनोज धकाते यांच्या कडून सहकार्य दिला जात आहे सदर घटनेची ठाणेदाराला काही एक माहिती न देता लपुन - छपून सगळी सेवा देण्यात येत आहे या गुन्हे शोध पथक पोलीसाचे माफिया सोबत साटेलोटे असल्याची चर्चा स्थानिक वरिष्ठ नागरीकांकडून व इतराकडून काही वर्षापासून जोमात सुरु आहे सकाळच्या वेळी व इतर वेळी ठाणेदार नसतांना डिबीरुममध्ये या माफियाकडून नास्ता पाणी पुरविले जातात माफियासोबत मधूरसंबंध ठेवून यांना चागली सोय वीआईपी सेवा या पोलीस कडून दिले जाते, अश्या पोलीसाची बदली करण्याची मागणी नागरीकांकडून व सामाजिक कार्यकर्तेतर्फे करण्यात येत आहे, कारण अश्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न निमार्ण होते.

## आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित




पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**नागपुर:** दि.17 सप्टेंबर रोजी नागपूर येथे आयोजित समता साहित्य अकादमी भारत यांच्या द्वारा नॅशनल टीचर दे कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला विविध राज्यातून मान्यवर व समाजाप्रती उत्तम कामगिरी करणारी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाला रामदास तडस खासदार वर्धा ,राऊत साहेब मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, डॉ डी. एस. तांडेकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यवतमाळ जिल्ह्यातून जि प शाळा इंदिरा नगर मालखेड च्या आशा वीर,जि प शाळा जळकापोड चे सुहास सुंकरवार,यवतमाळ पंचायत समितीचे अजय पारधी यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी रवींद्र अंबुले नागपूर विभाग प्रमुख शिक्षक सहकार संघटना महाराष्ट्र राज्य,शशिकांत चापेकर जिल्हाध्यक्ष शिक्षक सहकार संघटना यवतमाळ,संतोष किनाके,विकास मेशेवार, लखन आत्राम उपस्थित होते.

## धावत्या ट्रकचा टायर फुटून उडाला जोरदार भडका; ट्रकसह ३५ टन साखरेची राख

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**सिंदी (रेल्वे) :** साखरेची पोती घेऊन छत्तीसगडकडे जात असलेल्या भरधाव ट्रकचा अचानक टायर फुटला. अनियंत्रित झालेला ट्रक रस्त्याच्या बाजूला लावत असतानाच अचानक आगीचा भडका उडाल्याने चालक-वाहकांनी उड्या मारून आपले प्राण वाचविले. परंतु ट्रकसह ३५ टन साखरेची राख झाली. हा अपघातवर्धा ते नागपूर महामार्गावर आमगाव-खडकीजवळ आज मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता झाला.

## लेबर कमिशनर सुनावणी मध्ये Rccpl सिमेंट कंपनीचे अधिकारी व ठेकेदार गैरहजर

### पुढील सुनावणी मध्ये गैर हजर राहल्यास कायदेशीर कारवाई

पब्लिक पोस्ट विशेष प्रतिनिधि



**घुग्घुस :** Rccpl सिमेंट कंपनी मध्ये कंपनी मुकुटबन तालुका झरी, जिल्हा यवतमाळ, इंजिनिअर चुकिने अपघात ग्रस्त पिडित कामगार,सागर विनायक इंगोले ची उपमुख्ख श्रम आयुक्त नागपूर येथे आज दि.20/09/2023 ला सुनावणी घेण्यात आले आहे. ह्या सुनावणी मध्ये सिमेंट कंपनी चे एकही पदाधिकारी व संबंधित ठेकेदार हजर झाले नाही.करिता कंपनी अधिकारी व ठेकेदार ला पुढील 10 ऑक्टोंबर ला सुनावणी साठी हजर राहण्याचे स्पष्ट निर्देश असिस्टंट लेबर कमिशनर नागपूर ने दिली आहे,जर कंपनी अधिकारी कामचुकार पणा करत सुनावणी मध्ये गैर हजर राहल्यास सागर इंगोले बाजुने एकतर्फी निर्णय दिला जाईल व कंपनी, संबंधित ठेकेदार वर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे ठेकेदार चे सुपरवायझर ला सुनावणी मध्ये खडसावले आहे, तरी अपघात ग्रस्त पिडित सागर इंगोले ला असिस्टंट लेबर कमिशनर नागपूर कडून यथायोग्य न्याय मिळेल असे अरुण मैदमवार सामाजिक कार्यकर्ता ह्यांनी म्हटले आहे.

## बस स्टँडची इमारत झाली जर्जर, २५ कोटींतून होणार नवे स्थानक

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी



**अमरावती :** येथील मध्यवर्ती बसस्थानकाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतीला ४९ वर्षे झाली असून, इमारतीचे आयुर्मान संपले आहे. दिवसेंदिवस प्रवाशांची वाढती संख्या व अन्य अडचणी लक्षात घेता एसटीच्या विभागीय नियंत्रक कार्यालयाने याठिकाणी नवीन इमारत बांधकामासाठी सुमारे १५ कोटी २१ लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. मात्र, या निधीत बसस्थानकाचे नव्याने बांधकाम पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे विभाग नियंत्रक कार्यालयाने वरिष्ठस्तरावर २५ कोटी रुपयांचा सुधारित प्रस्ताव सादर केला आहे. सध्या एक हेक्टर जागेवर बसस्थानकाचा कारभार सुरू आहे. यामध्ये बसस्थानकात किरकोळ कामासाठी कार्यशाळा तसेच आगार व्यवस्थापकांचे कार्यालय, डिझेल पंप, चालक-वाहकांसाठी विश्रामगृह आदींचा समावेश आहे. त्यापैकी बसस्थानकासाठी ६० हजार स्केअर फूट जागा असून, त्यामध्ये केवळ दहाच फलाट आहेत. तेही अपुरे पडत आहेत. परिणामी प्रवाशांना गर्दीच्या वेळी गैरसोयीचा सामना करावा लागतो. याशिवाय बसस्थानकाच्या छतालाही वारंवार डागडुजी करावी लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, सन २०२३-२४ मध्ये राज्यातील इतर काही बसस्थानकांसोबत अमरावती बसस्थानकाच्या बांधकामासाठी १५.२१ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मात्र, सध्या आहे तेवढ्याच जागेत नवीन बसस्थानक तयार करून विशेष फायदा होणार नाही. त्यामुळेच १५.२१ कोटी ऐवजी २५ कोटी रुपये निधी मिळाल्यास त्याच ठिकाणी संपूर्ण जागा बसस्थानकासाठी वापरात घेऊन विस्तीर्ण बसस्थानक साकारले जाऊ शकते. या अनुषंगाने सुधारित प्रस्ताव पाठविला आहे. या प्रस्तावानुसार बसस्थानकाच्या समोरील बाजूने दहा व मागील बाजूने तसेच ग्रामीण भागात जाणाऱ्या बससाठी स्वतंत्र पाच असे एकूण २५ फलाट प्रस्तावित केले आहेत. हा प्रस्ताव पाठविला असून, त्याला अद्याप मान्यता मिळालेली नाही.

## विजेच्या तारांच्या धक्क्याने दाम्पत्याचा मृत्यू, एक महिला गंभीर

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**गोंदिया :** सडक-अर्जुनी तालुक्याच्या ग्राम घाटबोरी / कोहळी येथील शेतात तुटलेल्या जीवंत विद्युत ताराला स्पर्श झाल्याने दाम्पत्याचा मृत्यू झाला. तर एक महिला गंभीर जखमी झाल्याची घटना २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता घडली. तुळशीदास रेवाराम लंजे (४५) व माया तुळशीदास लंजे (४२) दोन्ही रा. घाटबोरी/ कोहळी अशी दाम्पत्यांची नावे आहेत. तर इंदु हिरालाल लंजे (४३) ह्या गंभीर जखमी आहेत.

## जिजाऊ बँकेचे सीईओ अपात्र तरीही पदावर कायम; बँकेच्या पदभरतीवर ठपका

पब्लिक पोस्ट प्रतिनिधि

**अमरावती :** राज्याच्या सहकार आयुक्तांकडे सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालातून जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेतील विविध महत्त्वपूर्ण बाबींचा भांडाफोड तपासणी अधिकाऱ्यांनी अभिप्रायातून केलेला आहे.


सद्य:स्थितीत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले नितीन वानखडे यांचे अनुभव प्रमाणपत्र संदिग्ध असल्याने त्यांना सीईओ म्हणून आरबीआयने १५ सप्टेंबर २०२१ रोजीच्या पत्रानुसार अपात्र ठरविले आहे. अपात्र असतानादेखील वानखडे हे पदावर आजही कायम असून, बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे यांच्या भूमिकेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिजाऊ कमर्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कारभाराविषयी अनेक तक्रारी झाल्यानंतर सहकार विभागाने सुरू केलेल्या चौकशीतून सहकार उपसंचालक (साखर) तथा चौकशी अधिकारी महेंद्र चव्हाण यांनी बँकेच्या कारभाराविषयी अनेक धक्कादायक बाबी अहवालातून उघड केल्या आहेत.

यामध्ये बँकेच्या विद्यमान सीईओंच्या नियुक्तीलाच आरबीआयने अपात्र ठरविले असतानादेखील आरबीआयच्या निर्देशांचे पालन न झाल्याबाबत बँकेला फटकारले आहे.

# राग आणि मानसिक आरोग्य

पब्लिक पोस्ट प्रतिनिधि

राहुल आणि विद्या यांच्या नात्याला जवळजवळ सहा वर्षे झाली होती. ते दोघेही जॉब करत होते. ज्यावेळी लग्नाचा विषय निघाला तेव्हा विद्याने राहुलला सगळ्या गोष्टी मनमोकळेपणाने सांगितल्या की तिला लग्नानंतर देखील जॉब करायचा आहे. राहुलचा तिला पूर्णपणे सपोर्ट होता. बघता बघता त्यांचं लग्न झालं. तिने विचार केला, असंही लग्नानंतर काही दिवस सुट्टी घ्यावी लागली असती तर आता तो वेळ ती नवीन जॉब शोधायला घालवेल आणि सोबत घरच्यांना देखील वेळ देता येईल.सगळ्या गोष्टी नवीन असल्यामुळे विद्याला पण हे सगळं आवडत होतं. रोज नवीन पदार्थ बनवणं, राहुल सोबत छान वेळ घालवण, सासू -सासऱ्यांची काळजी घेणं. हे सगळं ती खूप मनापासून करत होती.पण जेव्हा केव्हा ती एकांतात बसलेली असे तेव्हा तिला अचानक जॉब विषयी किंवा ती आधी काय काम करायची, नवीन गोष्टी शिकण्यासाठीचा तिचा उत्साह, बाहेर जाऊन काम करण्याची आवड, तिच्या क्षेत्रामध्ये नवीन गोष्टींचा अभ्यास करण्याची आवड हे आठवून तिची चिडचिड होत असे.




तिला कळत नसे की काय करावं? तिची चलबिचल होत असे! तिचा राग इथं पर्यंत गेला कि तिने रागात बोलून टाकलं कि लग्न उगाच केलं त्यामुळे असं सगळं होत आहे. राग येणं हे अगदी साहजिक आहे. पण त्यासोबत आणखीन कोणत्या भावना आहेत ज्या आपल्याला अश्या कठीण परिस्तिथी मध्ये अनुभवायला येतात याविषयी आपण जागरूक असायला हवं. खूपदा राग हा भीतीतून निर्माण झालेला दिसून येतो. जस,विद्याला जॉब ठरवलेल्या वेळेत न मिळाल्यामुळे तो न मिळण्याची भीती होती परिणामी त्याच रूपांतर रागात झालं. कधी कधी मनातल्या गोष्टी सांगितल्या नाही खूप काळ,तरी देखील राग अनावर होऊ शकतो. जस कि विद्याने नेमकं तिला काय वाटत आहे हे बोलून न दाखवल्यामुळे तिने अशी काही विधाने केली ज्यामुळे बाकीच्यांची मने दुखावली गेली.

ह्या सगळ्यात तिला राहुल कडून अशी अपेक्षा होती कि त्याने तिला समजून घ्यावं . तिचा राग त्याने समजून घ्यावा.राहुल जेव्हा घरी यायचा तेव्हा ती त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करायची. पण राहुल तिला फक्त एवढंच म्हणायचा की, "अगं मिळेल नवीन जॉब होईल सगळं ठीक."पण हे ऐकून विद्याला तात्पुरतं बरं वाटायचं पण राहुल तिला पूर्णपणे समजून घेत नाही असं वाटायचं. तिच्या मनात जो गोंधळ उडालेला आहे त्या विषयीची चिडचिड ती तिच्या रोजच्या कामावर काढत आहे. पण पुन्हा त्यावरती फार काही सुचत नसल्यामुळे ती काही करू शकत नव्हती आणि मग पुन्हा आहे तेच रोजचे चक्र चालूच राहायचे.

अपेक्षा रागाच्या नाण्याची दुसरी बाजू आहेत.जेव्हा आपल्याला एखाद्या व्यक्तीवर किंवा परिस्थितीवर राग येतो तेव्हा तो व्यवस्थितपणे व्यक्त न करता आल्यामुळे बऱ्याचदा आपल्याला रडू कोसळतं आणि त्यामुळे अशी भावना येते की इतकं करून देखील त्रास मलाच होत आहे. म्हणून आपल्याला काय वाटत आहे हे स्पष्टपणे बोलण्याने समोरच्या व्यक्तीला देखील आपल्या भावना समजून घेण्यास मदत होते.

म्हणता म्हणता सात-आठ महिने निघून गेले. विद्याने बऱ्याच ठिकाणी नोकरीसाठी अर्ज देखील केकाता होते पण तिला फारसा काही चांगला प्रतिसाद येत नव्हता. त्यामुळे देखील तिचा राग अनावर होत चालला होता.तिने हा समज करून घेतला की घरातल्या कामांमुळे आणि आहे तो जॉब सोडल्यामुळे तिला ह्या सगळ्या गोष्टी फेस करायला लागत आहे. तिने असं ठरवलं की आता जो मिळेल तो जॉब करायचा भले तो तिच्या फिल्ड मधला नसला तरी चालेल.ह्यातल्या काहीच गोष्टी न घडल्यामुळे विद्याला हतबलता जाणवत होती. असं देखील होत, आपल्याला अनेकदा अंदाज येत नाही की आपण नेमकं रागावलो आहोत की आपल्याला भीती वाटते आहे? की माझ्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे माझी चिडचिड होती आहे?जेव्हा आपल्याला लक्षात येतं की नेमकं मी आता कोणत्या भावनेमधून जात आहे तेव्हा आपल्याला आपल्या रागावर काम करणं सोपं जातं.रागाचा परिणाम हा आपल्या शरीरावर तर होतोच तसेच आपल्या जवळच्या नात्यांवर,आपल्या दैनंदिन जीवनावर देखील होतो.

**त्यामुळे आपण रागावर काम कसे करू शकतो याचा विचार केला पाहिजे.**

- **-जसे की बोलण्यापूर्वी काही वेळ घेऊन विचार करून बोलणे,**
- **-जेव्हा आपण शांत होऊ तेव्हा व्यक्त होणे,**
- **-नियमितपणे व्यायाम करणे**
- **-डायरी लिहिणे**
- **-फिजिकल ऍक्टिव्हिटी द्वारे राग काढणे**
- **-दिवसातला काही वेळ स्वत:साठी काढणे**

**आणि सगळयात महत्त्वाचं जेव्हा तुम्ही सगळया गोष्टी ट्राय करून देखील राग का येतोय,तो कसा हाताळावा हे लक्षात येत नाहीये तर कॉल करा मुक्ता मानसिक स्वास्थ्य हेल्पलाईनला (७८८-७८८-९८८२)**

महत्वाचे



## विश्वनाथ सिंह बयास नागरी पतसंस्थेच्या तज्ञ संचालक पदी मनोहर बोंबले व विशाला कांबळे

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**

पुसद : तालुक्यातील लोकनेते मनोहरराव नाईक यांच्या वाढदिवशी औचित्य साधून २००८ साली शुंभारभ झालेला स्व सतिष भाऊ यांच्या अधक परीश्रामने भरभराटीकडे गेलेलेला स्व विश्वनाथसिंह बयास नागरी पंत संस्थेच्या तज्ञ संचालक पदी पत्रकार मनोहर बोंबले व सामाजीक कार्यकर्ते विशाल कांबळे यांची निवड करण्यात आली आज झालेल्या बॅकेच्या मिंटीग मध्ये विश्वनाथ सिंह नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष निशांत बयास यांनी नवयुक्त तज्ञ संचालक मनोहर बोंबले विशाल कांबळे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला यावेळी देशभक्त सरनाईक वाचनालयाचे अध्यक्ष योगेश राजे बॅकेचे उपाध्यक्ष हरीप्रसाद विश्वकर्मा संचालक योगाजी गवळी रेणूदेव डुब्बेवार बाबु तातेवार सतोष मुराई अभिजित बासटवार राजकुमार वायकुळे संजय पवार सुजना अशोक प्रतापवार आशा दिपक येरावार रिकू वाजा राजेश मुराई यांनी तज्ञ संचालकाने पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले




## स्पेस ऑन व्हिल या कार्यक्रमाचा बक्षिस वितरण सोहळा

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**

महागांव : 'इस्त्रो' आणि 'विभा' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम "स्पेस ऑन व्हिल" हा कार्यक्रम बुधवारी (ता.२०) रोजी महागाव तालुक्यात संपन्न झाला. या कार्यक्रमाअंतर्गत काही वेग वेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये तालुक्यातील एकूण ३६ शाळेने सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा , पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धा व रांगोळी स्पर्धा ह्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये तालुक्यातील प्रियदर्शनी कॉन्व्हेन्ट स्कूलमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला त्यामध्ये प्रथम क्रमांक आरव गिरीश नरवाडे, (वर्ग ७ वा) प्रश्न मंजुषा स्पर्धा, दुसरा क्रमांक संस्कृती राजेश काळे (वर्ग ७ वा), रांगोळी स्पर्धा तसेच दुसरा क्रमांक लावण्या नंदकुमार कावळे (वर्ग ६ वा) पोस्टर प्रेसेंटशन या स्पर्धेमध्ये पारितोषिक पटकावले आहे.

## आगार व्यवस्थापक अधिका-यांची हुकूमशाही चालक, वाहकाची विभागीय नियंत्रकाकडे तक्रार

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**

**दिग्रस** : यवतमाळ जिल्ह्यात संपूर्ण तालुक्यात 22 जुलै व 27जुलै 2023 रोजी अतिवृष्टी मुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. जनजीवन विस्कळीत झाले होते. त्यामुळे कुठलीही जीवित हानी होऊ नये याकरिता वि. जिल्हाधिकारी साहेब यवतमाळ यांनी सुट्टी जाहीर केली होती.त्या दोन्ही दिवशी चालक, वाहक हे वेळेवर डेपोमध्ये आपली ड्युटी करण्याकरिता हजर झाले होते. वाहतूक व्यवस्था चालू नसल्यामुळे बसेस आगारात उभ्या होत्या परंतु दिग्रस आगार मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हुकूमशाहीमुळे सर्वांचा पगार मात्र काढण्यात आला नसून आमचेकडून दबावतंत्रच वापर करून बळजबरीने सुट्टीचे अर्ज मागणी करीत असल्यामुळे आमचा पगार आम्हाला देण्यात यावा अशी मागणी 18/8/2023 रोजी वि. विभागीय नियंत्रक यवतमाळ यांचेकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे. संदर्भीय परिपत्रक /आदेशाच्या अनुषंगाने महामंडळ आणि कामगार संघटना यामध्ये समझोता होऊन मागणी काळात 1996--2000मधील कलम 35 अन्वये समझोता करण्यात आला होता. त्या अनुषंगाने त्यांचे अनुपालन करणे आगारातील अधिकाऱ्यावर बंधनकारक असताना उलट आमचे वर दबाव तंत्रचा वापर होत असल्याचे तक्रारीमध्ये नमूद करून जिल्हाधीकारी यांचे जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाल्याच्या कारणास्थव आप्पती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 25 पोट कलम (1) मधील धारा 14 उपधारा (1)मधील अधिसूचनेनुसार दोन दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली असताना व आम्ही ड्युटी वर हजर राहण्याकरिता डेपोमध्ये उपस्थित झालो होतो. आमचा पगार न काढणे म्हणजे आमच्यावर अन्याय होत असून टी. आय, डिपरकर व त्यांचे दोन सह्हयय यांनी रजेचे अर्ज सादर करण्यासाठी दबाव टाकीत असल्याचे दिलेल्या तक्रारीमधून केला आहे. तक्रारीवर लक्ष्मण धर्म राठोड, जी. बी. भोयर, मो. रफिक अ. आजीस, विनोद प्रकाश जाधव, ईश्वर चव्हाण, मो. सलमान मो. अल्ताफ, के. पी. राठोड, सुखदेव राठोड, सुखदेव दुठाडे, पुंडलिक राठोड, ज्ञानेश्वर गवई, अनिल राऊत, किसन भांगे, दिगंबर लडके, सै. महिन सै. मोबीन इत्यादीच्या स्वाक्षरी आहे. प्रतिलिपी वि. कामगार अधिकारी म. रा. मार्ग प. महामंडळ विभाग यवतमाळ, तथा वि. सुरक्षा तथा दक्षता अधिकारी यांचेकडे केले आहे.

## रायुकाँच्या अध्यक्षपदी आकाश चंदू राठोड

पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी



आर्णी : तालुक्यातील केळझरा (कोमटी) येथिल युवा नेतृत्व, आकाश चंदू राठोड यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या आर्णी तालुकाअध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा निरीक्षक श्री.अफजल फारुखजी, अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ.प्रा.सुरेखाताई देशमुख, जिल्हाध्यक्ष वर्षाताई निकम, जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते आशिषजी देशमुख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल कानारकर, आर्णी तालुका अध्यक्ष सुनील पोतगंटवारसह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते उपस्थित, आकाश राठोड हे सामाजिक कार्यात सदैव तत्पर राहत असून त्यांच्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी अनेक जनहिताची कामे केली आहेत. तालुक्यामध्ये ६ सर्वधर्मीय सामूहिक विवाह मेळाव्याचे यशस्वी नियोजन करुन, सामूहिक विवाह मेळाव्यात आजवर 485 जोडपे विवाहबद्ध झाली आहे,जेव्हा जेव्हा रक्ताची गरज लागली तेव्हा तेव्हा रक्तदान शिबिर घेऊन, सामाजिक कार्यात भर पडली आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आज त्यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे, विशेषता त्यांचे वडील सुद्धा सामाजिक कार्यात आपलं संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यात समर्पित केले आहेत, त्यांच्या वडिलांना कला क्रीडा सामाजिक संस्कृती कार्याबद्दल अनेक पारितोषिक मिळालेले आहेत.

# आदिवासी आदिम कोलाम जमातींच्या महिल्या धडकल्या पोलिस स्टेशनवर

## सदर प्रकरणात आपण योग्य पळताळणी करुन कारवाई करु : ठाणेदार अमोल माळवे

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**



**पांढरकवडा** : तालुक्यातील करंजी शिवारात वसलेल्या मंगी गावातील जाण्या येण्याच्या रस्त्यावर अवैधरित्या धाबा टाकुन बसलेल्या ढाबा मालकांनी आदिवासी आदिम कोलाम जमातीच्या महिलांना अश्लील भाषेत जातीवादक शिवीगाळ करतात व त्याठिकाणी बाहेर प्रांतातील ट्रक उभे राहतात तेव्हा शेतात जातावेळी . शिवीगाळ करतात या करिता ठाणेदार यांनी कारवाई करावी अशी तक्रार देण्यात आली . सविस्तर व्रुत असे की दि. २० सप्टे. रोजी मंगी या गावचे रहिवासी असुन आमचे शेत सुध्दा त्याठिकाणी आहे त्या करीता शेतात जाण्याचा रस्ता आहे . राष्ट्रिय महामार्ग क्र. ४४ शिवार मंगी या ठिकाणी अवैधरित्या धाबा बांधकाम करण्यात आला असुन त्या धाब्या जवळुन शेतात जाण्यासाठी रस्ता आहे मात्र या धाब्यावर मोठ्या प्रमाणात प्रप्रांतातले ट्रक थांबुन राहतात . धाबा चालविणारा युवक व मालक नेहमी महिलांना छेडतात आम्ही अशिक्षीत गरिब मजुरदार आदिम कोलाम जमातीचे असुन कशलाही ज्ञान नसल्यामुळे दुर्लेक्षीत राहतो मात्र अनेक दिवसापासुन सदर धाबेवाला नाहक त्रास देत असून . १७/९/२०२३ रोजी आदिम कोलाम समाजाचा पारंपारीक आतारी सन साजरा करुन येतांना वंश दादाराव चव्हाण ,दादाराव शिवाजी चव्हाण ,धिरज मारोती चव्हाण ,विष्णु पवार ,सुरज मारोती चव्हाण ,यांनी सचिन तुकाराम आत्राम यांना बेदममारहाण केली व जातीवादक शिविगाळ केली . तुम्ही कोलामळे काहिच करुन शकत नाही असे काहिही करायचे असेल करुन घ्या अशी धमकी दिली असल्याचे तक्रारीत नमुद आहेक्ष. अशिक्षीत महिला पो स्टे ला तक्रार देण्यासाठी आल्या असता . कर्तव्यावर असलेले पोलिस कर्मचारी तक्रार घेतली नाही व सायं . ५ वाजे प्रर्यत झाडाखाली बसवुन ठेवले नंतर हाकलुन दिले अशा आरोप महिलांनी तक्रारीतुन केला आहे . सदर व्यक्ती हा दहशतमाजवीत असुन सदर धाबा हा अतिक्रम जागेवर असुन तो बंद करावा अशीही मागणी तक्रारीतुन केली आहे. त्यांच्या विरुध्द अनुसुचीत जमाती छेडखाणी , व जिवी मारण्याची धमकी ,अश्लिल शिवीगाळ करणे संदर्भात गुन्हे नोंद करावे . अशी मागणी सुध्दा करण्यात आली आहे .दादाराव चव्हाण हा व्यक्ती मागिल महान्यात येथील गटविकास अधिकारी जाधव यांना लाच लुचपत विभागाकडुन पकडुन देण्याचे कार्य केले असुन आता आपण काहीही करु शकतो अश्या तोऱ्यात गोर गरीब आदिवासी आदिम कोलाम जमातीच्या महिलांनवर बळजबरी अश्लील शिविगाळ व व जिवे मारण्याची धमकी खुले आम करु लागला आहे करीत ठाणेदार यांनी या प्रकरणी सखोल चौकशी करुन आदिम कोलाम जमातीच्या महीलांना न्याय मिळुन द्यावा करीता आदिवासी आदिम कोलाम जमातीच्या २०/२५ महिला येथील ठाणेदार अमोल माळवे यांना तक्रार दिली यावेळी शामादादा कोलाम संघटनेचे जिल्हध्यक्ष राहुल आत्राम ,अ. भा. आदिवासी विकास परिषदेचे जिल्हाउपाध्यक्ष संभा मडावी ,कोलाम संघटनेचे सचिव गणेश आत्राम ,सामाजिक कार्यकर्त सुरेश मुंडले कोलाम उपस्थीत होते .

## लाडखेड पोलीसांनी चोरटयास केले 12 तासात जेरबंद

**पब्लिक पोस्ट । प्रदीप मेश्राम**



लाडखेड : लाडखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वडगाव गाढवे येथील आरोपी नामे अरविंद नारायन जाधव वय 35 वर्ष वडगाव गाडवे यास लाडखेड पोलिसांनी बारा तासाच्या आत सखोल चौकशी करून जेरबंद केले यातील. आरोपी अरविंद याने फिर्यादी राजु पांडुरंग मनवर रा . वडगाव गाडवे हे अंतिम संस्कार करून तिसऱ्या दिवसाच्या कार्यकमा करिता साहित्य आनने साठी बाहेर गावी गेले असता पत्नी ही दाराची कडी लावून किराणा दुकाणात सामान आनने साठी गेली असता . कोणीतरी अज्ञात इसमाने दाराची कडी काढुन घरातील डब्या मध्ये ठेवूनअसलेले सोन्याचे पदक पाच नग .किंमत अंदाजे 14 हजार रुपये सोन्याचे मनी 24 नग दोन ग्रॅम किंमत अंदाजे दहा हजार रुपये चांदीच्या दोन पाटल्या वजन अंदाजे 15 तोळे किंमत अंदाजे दहा हजार सहाशे पन्नास रुपये असा एकूण 34000 750 रुपये चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने करून नेला आहे त्याबाबत राजू पांडुरंग मनोहर यांचे जवानी रिपोर्ट वरून लाडखेड पोलिसांनी गुन्हा नोंद केला सदर गुन्ह्यातील आरोपी हा अज्ञात आरोपी असल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी आदित्य मिरखेलकर दारव्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन लाडखेड ठाणेदार स्वप्निल निराळे यांनी अधिकारी व अमलदार यांची पथक तयार करून गुन्ह्याचा तपास करण्यात आले सदर पथकातील अधिकारी व अंमलदार यांना .मिळालेल्या गोपने माहितीवरून गुन्हा दाखल झाल्यापासून बारा तासाच्या आत यातील आरोपी नामे अरविंद नारायण जाधव यास ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी केली असता त्याने सदर गुन्हया मध्ये सोन्या चे पदक पाच नग सोन्याच मनी 24 नग चांदीच्या दोन पाटल्या असा एकूण मुद्देमाल 34000 750 रुपयाचा मुद्देमाल चोरी केल्याचे कबुली दिल्यानेवरील वस्तू जप्त करण्यात आल्या ही कारवाई लाडखेड ठाणेदार स्वप्निल निराळे . उपनिरीक्षक रितेश दीक्षित .प्रकाश रत्ने . विठ्ठल कोपनार जयंत शेंडे यांनी पार पाडली.

## बाळासाहेब सोनोने यांना जीवन गौरव पुरस्कार

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**

**नेरपरसोपंत** : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती प्रतिष्ठाण पुसदच्या वतीने देण्यात येणारा " गोपाळबाबा वलंगकर जीवनगौरव पुरस्कार " सातेफळ येथील सामाजिक धम्म चळवळीतील मा. बाळासाहेब सोनोने यांना नुकताच जाहीर झाला.

सामाजिक क्रांतीचे अग्रणी महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सद्यशोधक समाज स्थापनेचे शतकोत्यरी सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त महात्मा फुले यांचे सहकारी तथा आंबेडकरपूर्व कालखंडातील आद्य समाज सुधारक सत्यशोधक गोपाळ बाबा वलंगकर यांनी लिहिलेले व रायगड येथून प्रकाशित या विनंती पत्र या पुस्तिकेचे 135 वे प्रकाशन वर्ष तसेच महार रेजिमेंट स्थापना दिनाचे औचित्य साधून "गोपाळबाबा वलंगकर जीवनगौरव पुरस्कार 2023" सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत पुढारी बाळासाहेब सोनोने यांचे अतुलनीय कार्य बघता ही निवड करण्यात आली.

बहुजन समाज आणि सामान्य माणसांशी सौहार्दपूर्ण सहज संवाद हे बाळासाहेबांचे वैशिष्ट्य आहे. आंबेडकरी चळवळ गतिमान ठेवण्याकरिता त्यांचे योगदान आहे. सदर पुरस्कार दि.१ आक्टोबरला एका विशेष समारंभात पुणे येथे प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल सगळीकडे अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## रेडीमिक्स कॉँक्रीट मिक्सरच्या धडकेत तरुणी गंभीर जखमी

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**



वाहतूक पोलिसांचा निष्काळजी पणा हा पुसद वासीयांना नवीन विषय राहिलेला नाही.रस्त्याचे काम सुरू असताना कोणत्याही प्रकारचे सांकेतिक चिन्ह वापरण्यात येत नसून रस्त्याचे काम करणाऱ्या वाहनांच्या क्षमता ही तपासल्या जात नसतात. तसेच अवैध वाहतुकीच्या वाढत्या संख्येमुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकात अपघात सातत्याने होत असतात.त्यामुळे शहरातील अपघातास जबाबदार असणाऱ्या वाहतूक शाखेतील पोलिसांवर कार्येवाही व्हायला हवी अशी मागणी शहरात जोर धरू लागली आहे.

**पुसद** : स्थानिक दि.२० सप्टेंबर रोजी स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात कॉंक्रिट मिक्सर टि.एम.टी.टाटा कंपनीचे एम.एच.-१२-एस.एफ.- ९८५३ या क्रमांकाच्या वाहनाने शिकवणी वर्गास शिकविण्यासाठी जात असलेल्या तरुणीस गंभीर जखमी केल्याची घटना घडली. एश्वर्या मधुसुदन बरडे वय २३ वर्ष रा. खतीबवार्ड असे जखमी तरुणीचे नाव आहे. तरुणी मोपेड टी.व्ही.एस. ज्युपीटर क्र.एम.एच.- २९-बि.१- ८९०६ ने नेहमी शिकवणी वर्गावर शिकवीण्याकरिता जात असते. दि. २० सप्टेंबर रोजी चे तीन वाजेदरम्यान एश्वर्या जात असताना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कॉंक्रिट मिक्सर टी.एम.टी टाटा कंपनीचे वाहन त्याचा क्र.एम.एच.-१२ एस.एफ.९८५२चा चालक नामे- भारत ज्ञानदेव देवळे वय२५ वर्ष रा. सोहळ ता कारंजा जि. वाशिम याने त्याच्या ताब्यातील मिक्सर वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन ऐश्वर्यास गंभीर जखमी केल्याने घटनास्थळी तोबा गर्दी जमली. तरुणीच्या दोन्ही पायास गंभीर स्वरूपाची इजा झाली असून स्थानिक खाजगी रुग्णालयातून नांदेड येथे हलविण्यात आल्याचे बरडे कुटुंबियांकडून कळते. वाहन चालक नाम भारत ज्ञानदेव देवळे वय २५ वर्ष, रा. सोहळ ता कारजा जि. वाशिम याने त्याच्या ताब्यातील मिक्सर वाहन आय.एम.टी.टाटा कंपनीचे क्र.एम.एच.१२-एस.एफ.९८५२ हे रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविल्याने हा अपघात झाल्याचे उपस्थितांकडून बोलल्या जात आहे. सदर घटनेची फिर्याद जखमी तरुणीचे काका विशाल नंदकिशोर बरडे यांनी शहर पोलिसांत दिली आहे.

## कत्तलीसाठी नेणा-या ४ गोवंशांना पोलिसांनी दिले जीवदान : एका संशयीताला केली अटक

### महागांव पोलिसांची कारवाई

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**



**महागांव** : मुक्या जनावरांची निर्दयतेने कत्तलीसाठी घेउन जाणाऱ्या गोवंशांची वाहतूक करणाऱ्या एका टाटाच्या ए.सी.ई वाहनावर कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण ४ गोवंशांना मुक्तता करण्यात आली आहे. हि कारवाई लेवा ते महागांव मार्गे उमरखेड येथे जात असतांना आंबोडा ब्रिज जवळील एका शेताजवळ बुधवारी (ता.२०) सकाळी साडेनऊच्या दरम्यान करण्यात आली. पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही गोवंश उमरखेड येथे पेढी येथुन निर्दयतेने कत्तलीसाठी घेऊन जात असतांनाची गुप्त माहिती व तक्रार बजरंग दलाच्या कार्यकर्तांकडून महागांव पोलिसांना मिळाली. यावरून नागपुर - तुळजापूर महामार्गावर आंबोडा रोडवर पोलिसांनी पेट्रोलिंग दरम्यान एक टाटाच्या ए.सी.ई. वाहनांला थांबवून पाहणी केली असता, त्यामध्ये संशयित आरोपी चालक सुभाष मधुकर खंदारे (वय ३७ वर्ष, रा.लेवा ता.महागाव) त्यांच्या एका टाटाच्या ए.सी.ई वाहन क्रमांक एम.एच.२६ बि.ई ०४४५ वाहनांमध्ये चार गोवंश व एक टाटाचे वाहन असा एकुण किंमत ३ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बजरंग दलाच्या कार्यकर्तांकडून दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोवंश श्री दत्तपुरी चॅरीटेबल ट्रस्टद्वारा संचालित श्री दत्तपुरी गोशाळा भोसा येथे जमा करण्यात आलेले आहे. हि कारवाई महागांव पोलिस स्टेशनचे ठाणेदार सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक केशव पुंजरवाड, जमादार सुहास कायटे, देवानंद वाघाडे, रायटर विष्णू काईट, पोलिस वाहनावरील चालक प्रविण इंगोले, अमित नुळे, होमगार्ड नंदु पवार, अक्षय घोलप यांनी केली. पुढील तपास ठाणेदार सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनात सवना बिटचे जमादार सुहास कायटे करीत आहेत.

## गंगा नदीच्या पात्रात अधिका-यांच्या वरदहस्ताने अवैध रेती तस्करी जोरात

**पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी**



**पांढरकवडा** : पावसाळा सुरु असल्यामुळे पोलीस व महसुल विभागाने रेती तस्करीकडे दुर्लक्ष केले, याचाच फायदा केळापुर तालुक्यातील रेती तस्कर घेत असल्याचे सध्या दिसत आहेत. तालुक्यातील गंगा नदिपात्रातून दररोज रात्रभर २० ते २५ मॅक्स पीक-अप वाहनाने रेतीचा उपसा सुरू आहेत. हा उपसा मागील एक-दोन महिन्यापासुन सुरु असुन दररोज शेकडो ब्रास रेतीची तस्करी होत आहे. शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा चुना लागत आहेत ही बाब स्थानिक यंत्रणेतील कर्मचाऱ्यांना माहिती असुन त्यांचीच या रेती तस्करीला मुखसमंती असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहेत. तालुक्यातून वाहणाऱ्या गंगा नदीच्या पात्रातून अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत रेती तस्करी होत आहे.

शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत असून, तस्कर आणि अधिकारी मालामाल होत आहेत. केळापुर येथून दररोज रात्री ११ च्या सुमारास रेतीच्या वाहनांची वर्दळ सुरू असते. यासाठी रेती तस्करांकडून मॅक्स पीक-अपच्या संख्येनुसार महसूल अधिकाऱ्यांना व पोलिसांना हाताशी धरण्यात येते. त्यामुळे महसूल व पोलीस अधिकारी या रेती तस्करांवर कारवाई करीत नाहीत. एखाद वेळी गावकऱ्यांनी तक्रार केलीच तर त्याची सूचना रेती तस्करांना देऊन नंतर धाड टाकली जाते. त्यामुळे एकही मॅक्स पीक-अप वाहन हाती लागत नाही. मात्र, जे अर्थपूर्ण व्यवहार करीत नाही त्यांचे वाहन जप्त केले जाते. दुसरीकडे रेतीच्या टिप्परमुळे चांगले रस्ते उखडले आहेत. धुळीमुळे रस्त्यावरील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. रेती तस्करांच्या मुजोऱ्या वाढण्यामागचे मुख्य कारण म्हणजे प्रशासन सुस्त तर रेती तस्कर मस्त; अशी परिस्थिती पहावयास मिळत असल्याने तालुक्यातील गंगा नदीचा पात्र अवैध तस्करांच्या विळख्यात सापडले असल्याचे हल्ली सर्वत्र चित्र दिसून येत आहे.

परिसरात गेल्या काही महिन्यांपासून महसूल व पोलिस विभागाच्या आशीर्वादाने दिवसाकाठी शेकडो ब्रास वाळूची अवैध तस्करी सुरू आहे. वाळू तस्करीकडे संबंधित विभागाची डोळेझाक सुरू आहे. दररोज अवैध रेती उपसाची माहिती प्रतिष्ठित व सुजान नागरिक महसूल व पोलीस विभागाला देतात. परंतु येथे तस्कर सापडतच नाहीत.असे हास्यास्पद उत्तर संबंधित विभागाकडून देण्यात येते. एवढेच नाही तर एखाद्या वेळी रेती तस्करांचे मॅक्स पीक-अप किंवा अन्य वाहन मिळाले तरी कारवाई न करता स्वार्थापोटी सोडून देण्यात येते असे प्रकार नेहमी होत असल्याची परिसरात चर्चा रंगू लागली आहे.

रेतीच्या या गोरखधंद्यात रेती तस्करांसोबत तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार, व खनिकर्म विभाग या सर्वांचे उखळ पांढरे होत आहे. त्यामुळे सर्वांनी बघ्याची भूमिका घेतलेली आहे. रेती तस्करीची सूचना दिल्यावरही कारवाई केली जात नाही अशी काही गावकऱ्यांची तक्रार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तरी यावर अंकुश आणण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मागणी होत आहे.पर्यावरणाचे नुकसान करण्यासह शासनाच्या महसुलावर दरोडा टाकणाऱ्या तस्करांना व या तस्करांना पाठीशी घालणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांनी आवर घालावा,व रेतीची चोरटी वाहतूक थांबवावी अशी मागणी पांढरकवडा परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## महत्वाचे

### माजी उपसभापती महेशभाऊ देवकते व सरपंच गंगुबाई भूते यांच्या हस्ते कॉंक्रेट रस्त्याचे भूमिपूजन



**पब्लिक पोस्ट गोविंद गोरे**

**जिवती:** तालुक्यातील ग्राम पंचायत राहपल्ली (खुर्द) येथील हिमातयनगर व मछ्जीगुडा येथील विकास कामाचे भूमिपूजन कार्यक्रम आज संपन्न झाला.जन सुविधा योजनेतून मा.ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांच्या माध्यमातून विविध विकास कामे मंजूर झालेले होते.सदर विकासकामे मंजूर व्हावे,यासाठी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराव भोंगळे तसेच माजी आमदार संजयभाऊ धोटे यांच्या प्रयत्नातून ही विकास कामे मंजूर करण्यात आली होती. या भूमीपूजन सोहळयाप्रसंगी जेष्ठ नेते तथा जिवती तालुक्याचे भा.ज.पा. अध्यक्ष केशव गिरमाजी, कार्यक्रमाचे अध्यक्ष गंगुबाई भूते,तालुका महामंत्री सुरेश केंद्रे,अनु जाती तालुका अध्यक्ष प्रल्हाद मदने, युवा मोर्चा तालुका अधक्ष गोविन्द टोकरे,बालाजी भूते, मुनीर सय्यद, वैजनाथ घुले, देविदास साबणे,बालाजी नलबले,ताजू शेख,ग्राम पंचायत सदस्य यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोयाबीन पिकावर करपा,बुरशी रोगा मुळे शेतकरी देशोधडीला

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**



**चंद्रपुर :** यावर्षी पावसामुळे सोयाबीन पिकावर करपा बुरशी रोग मुळे सोयाबीन पिक पूर्ण पणे हातुन निघुन गेले आहेत.या परिस्थितीतून शेतकरी देशोधडीला लागल्याच्या मार्गावर असून केलेला खर्चही मिळतो का नाही? शेतकरी आहेत या परिस्थितीत राज्यकर्ते आश्वासनाची खैरात वाढत असले तरी प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या पदरात काय पडणार ?असा प्रश्न प्रहार सेवक विनोद उमरे यांनी उपस्थित केला आहे. सोयाबीन पिकावर बुरशीजन्य रोगा व लागलेल्या शेंगांची गळती होत आहे उत्पादन हे एक मे शेतकऱ्यांना जीवन जगण्याचे साधन असलेल्या शेतकरी देशोधडीला लागल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे हा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रत्येक वर्षी हीच परिस्थिती असून कधी कोंडा तर कधी ओला दुष्काळ सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे यावर्षी अतिरोगरामुळे सोयाबीन पिक हातुन निघून गेले आहेत. पंधरा दिवसात सोयाबीन पीक पूर्ण पणे हातून निघुन गेले आहे. शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले आहेत राज्यकर्त्यांची आश्वासनांची खैरात झटकत असल्या तरी प्रत्येक शेतकऱ्यांना काहीच दिलासा मिळालेला नाही यापुढे तो मिळेल याची शक्यता पावसाच्या कागदपत्रे वाढलेल्या आकडेवारीतून दिसून येते. सोयाबीन पिकावर करपा,बुरशी रोगामुळे शेंगा आहेत परंतु त्यामध्ये दाणे नाही काय शेंगांमध्ये दाणे असले तरी त्याची वाढ नाही त्यामुळे पिकात उत्पादन मिळणे दुरच परंतु केलेला खर्च निघतो की नाही? एवढी भयानक परिस्थिती आहे.

### 'होऊ द्या चर्चा' ; चंद्रपूर शिवसेना करणार सरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड



**पब्लिक पोस्ट शिरीष उगे**

**वरोरा :** शिवसेना (उबाठा ) वतीने केंद्र सरकार व राज्यसरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड करण्याकरिता "होऊ द्या चर्चा" हा कार्यक्रम वरोरा - भद्रावती विधानसभेतील प्रत्येक गावागावात राबविण्याच्या अनुषंगाने दिनांक १७ सप्टेंबर रविवारी स्नेहमिलन कार्यालय येथे शिवसेना उपनेते तथा कामगार नेते व माजी नगरसेवक मनोज जामसुतकर यांच्या नेतृत्वात व माजी नगरसेवक सूर्यकांत पाटील व जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये आढावा बैठक पार पडली. केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यापासुन शासनाने विविध योजनाची प्रचंड जाहिरातबाजी केली, प्रत्यक्षात या सर्व योजना फसव्या व केवळ घोषणाबाजीच होत्या. मुद्रा लोन, उज्वला गैस, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट, जन धन, स्वानिधी, किसान सन्मान योजना, जलजीवन अशा अनेक योजना योजनांतील सत्य काय ते गावा-गावात जाऊन लोकांना सांगावे व या सर्व योजना फसव्या असल्याचे उदाहरणे द्यावीत. येत्या १ ते १२ आक्टोबर दरम्यान प्रत्यक्ष जनतेत जाऊन या योजनांची पोल-खोल करावी, असे आवाहन शिवसेना उपनेते मनोज जामसुतकर यांनी केले. जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे म्हणाले कि, राज्यातील दुष्काळी परिस्थिती व त्यामुळे प्रचंड अडचणीत आलेला शेतकरी या बाबत सरकारची असणारी उदासीन भुमिका यावरही चर्चा करावी. संपूर्ण महाराष्ट्र भर होऊ द्या चर्चा अभियान राबविण्यात येणार असुन चंद्रपूर जिल्हयात ही मोहिम यशस्वी करण्यासाठी स्नेहमिलन कार्यालय सरदार पटेल वॉर्ड येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी वरोरा व भद्रावती तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन पुढील महिन्यात स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मदतीने वरोरा - भद्रावती विधानसभा क्षेत्रातील पंचायत समिती , जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रत्येक गावात 'होऊ द्या चर्चा' हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मत याप्रसंगी व्यक्त केले.

# रोपवन सुरक्षा जाळी एका महिन्यात स्वाहा

## त्या ठेकेदारासं ब्लॅक लिस्टवर टाकण्याची मागणी



**योग्य रीतीने काम होईस्तो बिल निघणार नाही-- नरेश भवरे वनपरीक्षेत्राधिकारि**

**संभंधित ठेका हा ई -प्रणाली नुसार निघाला असून या कामावर अभियंता याची देखरेख असते तरी सुद्धा आम्हीची हि या कामावर नजर असते , जो पर्यन्त काम योग्य प्रकारे होत नाही तो पर्यंत बिल निघत नसल्याचे पब्लिक पोस्ट शी बोलताना वनपरिक्षेत्रधिकारी नरेश भवरे यांनी सांगितले. ज्या दोन ठेकेदारासं काम देण्यात आले, त्यांनी आज पर्यंत केलेल्या कामाची चौकशी करण्यात यावी. व अशा ठेकेदारासं ब्लॅक लिस्ट मध्ये टाकावे जेणे करून विभागाचे पुढे होणारे नुकसान टाळता येईल.**

**पब्लिक पोस्ट राहुल गायकवाड**

**बल्लारपूर:** बल्लारपूर लगतच्या इटोला मानोरा परिसरातील बीट क्रमांक 450 व बीट क्रमांक 449 मधील रोपवना चे सुरक्षेकरिता जाळीचे काम इनिविदाद्वारा चंद्रपूरच्या एका ठेकेदारास देण्यात आले मात्र सदर ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे जाळ्या लावून व हलक्या दर्जाचे काम केल्याने एकाच महिन्यात सिमेंट चे पोल स्वाहा झाल्याचे चित्र दिसत आहे.त्या ठेकेदारासं ब्लॅक लिस्ट मध्ये वनविभागाने टाकावे अशी मागणी होत आहे. बल्लारपूर वनपरिक्षेत्रातील बीट क्रमांक 450 व 449 मधील रोपवण सुरक्षे करितासुरक्षा जाळीचे ई-निविदा निघाले होते त्यात चंद्रपूर येथील दोन्हि ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम करीत हलक्या दर्जाचे जाळ्या व सिमेंट पोल लावल्याने सदर सुरक्षा जाळ्या एका महिन्यात पाण्यात स्वाहा झाल्याचे चित्र दिसत आहे. सदर ठेकेदार हा जास्त कमाईच्या हव्यासापोटी चक्क रोपवना चा जाळ्या हलक्या दर्जाच्या लावून सदर कामाचे बिल काढण्याचा प्रयत्न होता मात्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या लक्षात येताच त्यांनी त्या तथकथित ठेकेदारास नव्याने काम करून द्यावे अन्यथा बिल थांबवण्यात येईलअशी तंबी दिल्याने त्या तथाकथित ठेकेदाराने पुन्हा काम सुरू केल्याचे समजते. बिट क्र. 450 व 449 येथील ठेकेदारावर कोनति कार्यवाही होते हा चर्चेचा विषय सध्या बनला आहे.

### पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अक्षय बोंदगुलवार यांची मागणी

## सोयाबीन पिकावर बुरशी रोगाचा प्रादुर्भाव

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**



**चंद्रपूर :** तालुक्यात सोयाबीन शेती जास्त प्रमाणात असून सोयाबीनची लागवड केल्यावर चांगले उत्पन्न होईल असे वाटत असताना सद्या च्या स्थितीत यालो मोझक व करपा रोगाचे प्रमाण जास्त प्रमाणात वाढल्याने सोयाबीन पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. सोयाबीन चे उत्पादन हातात आल्या हातचे रोगामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. त्यामुळे सोयाबीन पिकाचे सर्वे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी प्रहार सेवक अक्षय बोंदगुलवार यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. सोयाबीन शेगाची सुरवात असताना सोयाबीन झाडे सुकू लागली आहे.येलोमोजाक व हिरवी अळी हे रोग लागले. तेव्हा शेतकऱ्यांनी औषधी साठी खर्च करून त्या पीक वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु नवीन आलेल्या बुरशी रोगा मुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला. शासनाने सोयाबीन पिकास कोणतेही मदतीचे निकस न लावता सरसकट आर्थिक मदत देण्याची मागणी प्रहार सेवक अक्षय बोंदगुलवार यांनी केली आहे.

## कवठाळा वासियांचे ऋण कधीही विसणार नाही : माजी आ. मितेशजी भांगडीया

### कवठाळा येथे आनंदाचा शिधा वाटप कार्यक्रम

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**



**चिमूर :** मागील निवडणुकीत कवठाळा बूथ मधून ९० टक्के मतदान बंटी ला मिळाले असल्याने कवठाळा गावाचे ऋण विसरणार नसल्याचे माजी आमदार मितेश जी भांगडीया यांनी सांगत शेती करीत असतानाच्या गोष्टी व तेव्हाचे सोबती यांचीशी संवाद साधून गाव फिरून जीप शाळे ला भेट दिली. स्व खर्चातून हॉल बांधकाम करून देण्याचे गावकऱ्यां ना सांगितले. कवठाळा येथील आनंदाचा शिधा वाटप प्रसंगी मंचावर संजय मालानी, भाजप तालुका अध्यक्ष राजू पाटील झाडे, नायब तहसीदार पवार सरपंच प्रवीण सावसाकडे,श्रेयस लाखे, सहदेव कापसे, दिलीप नलोडे, विलास घार्गे, रोशन बनसोड, सचिन मेश्राम, मनी रॉय पोलीस पाटील सुनीता राजूरकर आदी उपस्थित होते. माजी आमदार मितेश भांगडीया यांचे हस्ते आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. संचालन एकनाथ थुटे यांनी केले. गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दर्शनासाठी आलेल्या महिलेच्या सोन्याच्या चेनची चोरी

**पब्लिक पोस्ट अतुल कोल्हे**

**भद्रावती:** दर्शनासाठी आलेल्या एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन चोरीला गेल्याची घटना शहरातील गवराळा येथील सुप्रसिद्ध गणेश मंदिरात घडली. चोरीला गेलेल्या 15 ग्रॅमच्या सोन्याच्या चेनची किंमत 70 हजार रुपये एवढी आहे. सदर घटनेची तक्रार भद्रावती पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी सदर मंदिरात भाविकांची गणेशाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी होती. शहरातील सुमन दत्तात्रय हेपट ही महिला सुद्धा मंदिरात दर्शनासाठी आली होती.दर्शनासाठी लाईन मध्ये ती उभी असताना मागे असलेल्या एक दोन स्त्रिया त्यांना समोर जाण्यासाठी धक्का देत होत्या. या संशयित महिलांनीच ही चोरी केली असावी असा अंदाज व्यक्त होत आहे. बाहेर




निघाल्यानंतर आपली चेन चोरीला गेल्याचे त्यांना लक्षात आले. त्यानंतर लगेच पोलिसांना माहिती दिल्यानंतर ते लगेच मंदिरात पोहोचले. त्यांनी शोधाशोध केल्यानंतरही त्या संशयित महिला आढळून आल्या नाही.भद्रावती पोलीस या अज्ञात महिला चोरट्यांचा शोध घेत आहे.

## सोयाबीन पिकावर बुरशी रोगाचा प्रादुर्भाव

### विमा कंपनीने नुकसान भरपाई द्यावी , डॉ सतीश वारजूकर यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना दिले निवेदन

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**चिमूर :** तालुक्यात सोयाबीन शेती जास्त प्रमाणात असून सोयाबीनची लागवड केल्यावर चांगले उत्पन्न होईल असे वाटत असताना सद्या च्या स्थितीत बुरशी रोगा मुळे सोयाबीन चे उत्पादन कमी होणार असल्याने शेतकऱ्यांत चिंता पसरली आहे. सोयाबीन पिकाचे सर्वे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होऊ लागली आहे. विमा कम्पनी फोन उचलत नाही त्यामुळे या प्रकरणात तहसीलदार यांनी स्वतः लक्ष देऊन विमा कँपणीला आदेश द्यावे अश्या मागणीचे निवेदन डॉ.सतीश वारजूकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. सोयाबीन शेगाची सुरवात असताना सोयाबीन झाडे सुकू



लागली आहे.येलोमोजाक व हिरवी अळी हे रोग लागले. तेव्हा शेतकऱ्यांनी औषधी साठी खर्च करून त्या पीक वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु नवीन आलेल्या बुरशी रोगा मुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला. शासनाने सोयाबीन पिकास कोणतेही मदतीचे निकस न लावता सरसकट आर्थिक मदत देण्याची मागणी परिसरातील शेतकरी बांधवांनी केली आहे निवेदन देततांना तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ.विजय गावंडे पाटील, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तालुका कॉंग्रेस कमिटी माजी अध्यक्ष माधवजी बिरजे,कांग्रेस कमिटी जिल्हा सरचिटणीस गजानन भाऊ बुटके,चिमूर तालुका अध्यक्ष अनु. जाती विभाग लोकांनाथ रामटेके,अनिलजी रामटेके, गजानन धानोडे, रमेश वासनिक श्रीहरी ढवस, नरेंद्र महाकुलकर किशोर घुमे, गजानन श्रीरामे, सुभाष कारेकर, हिरामणजी निखाडे, शामरावजी हिवंज,राजू दुमणे, घनश्याम घुमे उपस्थित होते.

# विधानसभा प्रमुख रविंद्र शिंदे यांच्या प्रयत्नाने मिळाले कामगारांचे थकित वेतन

**पब्लिक पोस्ट अतुल कोल्हे**



**भद्रावती:** शिवसेना पक्ष 80% समाजकारण व 20% राजकारण या ध्येय्यधोरणावर चालत असुन वरोरा भद्रावती विधानसभा प्रमुख रविंद्र श्रीनिवासराव शिंदे यांनी याच धोरणाचा अवलंब करुन वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रामध्ये कामाचा झंझावात चालविला आहे. शिवेसेनेच्या वरोरा येथील कार्यालयात नेहमीच विधानसभा क्षेत्रातील नागरीक आपल्या समस्या घेवुन येत असुन त्या समस्या मार्गी लावण्याकरीता रविंद्र शिंदे नेहमीच तत्पर असतात. समाजातील गरजवंताला आपली मदत पोहचावी या हेतुने सामाजिक कार्य सुरू असुन समाजातील तळागाळातील लोकांची कामे या माध्यमातुन करण्याचा ध्यास विधानसभा प्रमुखाने घेतलेला आहे. मजरा येथील बि.एस.पी.इस्पात कंपनीमध्ये वरोरा भद्रावती तालुक्यातील आसपासच्या खेड्यातील कामगार लकी कॉन्ट्रक्टर यांच्याकडे डिसेंबर 2020 पासुन नियमित कामावर होते. लकी कॉन्ट्रक्टर यांचा कंपनीशी असलेला कॉन्ट्रक्ट 2023 मध्ये संपुष्टात आल्यानंतर बि.एस.पी.इस्पात कंपनीने सदर कामगारांना कामावर ठेवुन घेतले व कंपनी त्यांचा पगार देईल असे सांगण्यात आले. एक महिन्याचा पगार दिल्यानंतर कामगार नेहमीप्रमाणे कामावर गेले असता त्यांना कामावर घेतल्या गेले नाही व त्यांना दोन महिन्यांचा पगार सुध्दा देण्याचे कंपनीने नाकारले. नियमाप्रमाणे त्यांना कामावरुन काढण्या अगोदर सुचना द्यायला पाहिजे होती व त्यांचा पगार पुर्ण द्यायला पाहिजे होता परंतु अशा प्रकारचे कोणतीही कार्यवाही कपंनीकडुन करण्यात आली नाही व त्यांना सरसकट कामावरुन कमी करण्यात आले. त्यामुळे त्यांनी सदर पगाराची रक्कम मिळण्याकरीता व कंपनीमध्ये कामावर परत घेण्याकरीता शिवसेना विधानसभा प्रमुख रविंद्र शिंदे यांची भेट घेतली असता त्यांनी तात्काळ कंपनीच्या अधिकाऱ्यांशी यासंबंधाने चर्चा करुन त्यांचे पगार देण्याबाबत व त्यांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत चर्चा केली व यासंबंधाने अधिकाऱ्यांशी बैठकिचे आयोजन केले. सदर बैठकिमध्ये कामावरुन काढुन टाकण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे थकित पगार देण्याचे कंपनीने मान्य केले व पोळा सणाच्या अगोदर कामगारांना त्यांचे थकित पगार कंपनीने त्यांच्या खात्यामध्ये जमा केले. त्यामध्ये पकंज वामनराव मुडे, गणेश सुरेश भोगेकर, नितेश विला बुरांडे, दिनेश सुधाकर कोमरेड्डीवार, अर्जुन नथ्थुजी आत्राम, विभीशन उधो सोनाजी, भालचंद्र गजानन बोढे, यश जसवंत देव, विनोद पांडुरंग मोहुर्ले, विजु कोडु सोनानी, सुरज चंद्रभान जीवतोडे, राकेश नानाजी खोके, गणेश ईश्वर बोढाले, सुनिल फुलकर, अविनाश रामटेके, सतिश तिखट, अनिल राजुरकर, प्रतिक जिवतोडे, अमोल आंबूरकर, वैभव मोकाशी, विक्की कुंभारे, प्रतिक मुन, रवि रामटेके, कुनाल ताडुरवार, यांची पगार थकित राहिलेले होते. वरील कामगारांचे वेतन मिळालेले असुन ज्यांचे वेतन बाकी राहीलेले आहेत त्यांना लवकरात लवकर थकित वेतन मिळणार असल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगीतलेले आहे. कंपनीचे थकित वेतन मिळालेल्या कामगारांनी शिवसेना विधानसभा प्रमुख रविंद्र शिंदे आभार मानले. याबाबत रविंद्र शिंदे यांनी बोलतांना सांगितले की, भविष्यातही असेच समाजपयोगी कार्ये करत राहणार असुन समाजातील वंचित, शोषीत तसेच कोणत्याही व्यक्तीला अडचण आल्यास त्यांनी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) कार्यालयाशी किंवा व्यक्तीशः संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केलेले आहे.

# शहरी व ग्रामिण भागात तोतयांकडुन "प्रेस" आणि "पोलीस" स्टिकरचा खुलेआम गैरवापर!

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** तोतया पोलीस कर्मचारी, इन्कमटॅक्स अधिकारी, विक्रीकर अधिकारी बनुन लोकांची लुट केल्याचे अनेक प्रकरण समोर आले आहेत. ज्याला पत्रकारितेचा "प" कळतं नाही, असा तोतया पत्रकारांचा आणि पोलीसांचा एक मोठा वर्गच आता सक्रीय झाला असल्याची खात्रीलायक माहिती आहे.

काही महाभागांनी तर जिल्ह्यात व शहरात खोटे ओळखपत्र तयार करून आपण पत्रकार असल्याचा बनाव सुरू केला आहे. खोटे प्रेस आयडी कार्ड देखिल पत्रकारितेची समज नसणाऱ्या

## वरिष्ठांनी दखल घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी




लोकांना दिले आहे. काही महाभाग " प्रेस" आयडी कार्ड तयार करून शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना पत्रकार असल्याचे सांगून मोठी वसुली करित असल्याने खऱ्या पत्रकारांना बदनाम करण्याचा प्रयत्न करित आहे. मी पत्रकार आहे असे सांगून लुबाडण्याचे प्रकार शहरात अनेक ठिकाणी होत आहेत. अनेक तोतया पत्रकार कॅमेरा घेऊन ठिकठिकाणी जाऊन ब्लॅकमेलिंग करत असल्याचे प्रकारही समोर येऊ लागले असून हा पैसे कमावण्याचा नवीनच फंडा आता समोर आला आहे. जे पत्रकार कष्टाने आणि प्रामाणिक काम करित आहेत त्या पत्रकारांना अशा तोतया पत्रकारांमुळे मनस्ताप सहन करावा लागतोय. मात्र असे प्रकार लक्षात आल्यानंतर नागरिकांनीही घाबरून न जाता अशा प्रकारची पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार करणे गरजेचे आहे आणि पोलीस लिहीलेल्या वाहन धारकांची तक्रार पोलीस अधिक्षक यांचेकडे करता येते. एखाद्या व्यक्तीवर संशय आला तर त्या पत्रकारांबाबत माहिती घेऊन संबंधित संस्थेला कळवणेही तेवढेच गरजेचे आहे. जेणेकरून तोतया पत्रकारांवर आळा बसू शकतो. प्रशासनाने " प्रेस " आणि " पोलिस" ही अद्याक्षरे असलेल्या सर्व वाहनांची कसुन तपासणी करुन चौकशी केल्यास अनेक बोगस आणि तोतयेगीरी करणारे महाभाग गजाआड होतील. सर्वोच्च न्यायालयाने खाजगी वाहनांवर " पोलीस" ही अद्याक्षरे लिहण्यास बंदी घातली असतानाही अनेक वाहनावर पोलीस ही अद्याक्षरे राजरोसपणे लिहलेली दिसतात. तसेच पत्रकार नसतानाही वाहनावर "प्रेस "ही अद्याक्षरे लिहून अनेक भामटे तोतयेगीरी करत आहेत. त्यांच्याही पोलिसांनी मुसक्या आवळल्या पाहिजेत. म्हणजे समाजातील गुन्हेगारी प्रव्रुत्तीला आळा बसेल, असे मत सुजाण नागरीकांकडुन व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षा कडुन उमेश इंगळे सन्मानित




पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** जकारिया फाउंडेशन, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष यांच्या वतीने जिल्ह्यातील रुग्णसेवकांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामधून उमेश सुरेशराव इंगळे सामाजिक कार्यकर्ता तथा रुग्ण सेवक महासचिव महाराष्ट्र राज्य रुग्ण सेवक व श्रमिक कामगार संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या सामाजिक तथा रूग्णसेवेच्या कामाची दखल घेत सत्कार करण्यात आला. यावेळी विवीध क्षेत्रातील मान्यवर व वैद्यकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

संजरी पेंटस्
दीपक चौक, अकोला
8149262424

एस.एस. खरोटे
सुवर्णकार, अकोला
Time-.6.49.51 Date-20.09.23

| | RATE PER 10 GAAM |
|---|---|
| GOLAD-24 CT.99.50 | 59900 |
| GOLAD-22 CT.916 | 58700 |
| GOLAD-18CT.750 | 54900 |
| SILVER | 73000 |

GST & MAKING CHARGES EXTRA

## महत्वाचे...

### विदर्भातील शेती शाश्वत आणि शेतकरी संपन्न करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणार- कुलगुरू डॉ. शरद गडाख



पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** डॉ . पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांना विद्यापीठ कुलगुरू पदाची सूत्र हाती घेऊन आज वर्षपूर्ती होत आहे त्याबद्दल त्यांचा कृषी विद्यापीठ परिवाराकडून सत्कार करण्यात आला. कुलगुरू कार्यालयात विद्यापीठ विकास समितीच्या सभेत संचालक विस्तार शिक्षण डॉक्टर धनराज उंदीरवाडे तथा कुलसचिव सुधीर राठोड यांनी पुष्पगुच्छ देऊन कुलगुरू महोदयांचे अभिनंदन केले. भूतपूर्व कुलसचिव डॉक्टर सुरेंद्र काळबांडे संचालक विसर शिक्षण डॉक्टर धनराज उंदीरवाडे तथा अधिष्ठा कृषी डॉक्टर शामसुंदर माने यांनी आपले मनोगते व्यक्त केली. तर कुलगुरूंनी सत्काराला उत्तर देताना सर्वांप्रति कृतज्ञता व भविष्यात सहयोगाची अपेक्षा देखील व्यक्त केली

### मुंबईतील लालबागच्या राजाला अकोल्यातून जानवे

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** महाराष्ट्रात गणेशोत्सवात सांस्कृतिक राजधानी पुण्यातील मानाच्या ५ गणपतीला आगळे स्थान आहे. या गणपतीला असलेले जानवे हे अकोल्याचे आहे. याशिवाय राज्यभरातील गणेशभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या मुंबईतील लालबागच्या राजाच्या सौंदर्यात २०१३ पासून अकोल्यातून जाणाऱ्या जानव्याला खास मान आहे. जानवे तयार करणे व परिधान करण्याचे एक शास्त्र आहे. अकोल्यातील राधा-श्याम चेंडके कुटुंबीय २०१२ पासून शास्त्रोक्त जानवे बनवतात. त्यांची २ मुले अजिंक्य व अथर्वही यात त्यांना मदत करतात. श्याम चेंडके यांनी कोल्हापूरच्या संस्थेतून प्रशिक्षण घेतले.

# खून प्रकरणातील आरोपी गजाआड

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी




**अकोला, ता.२१ :** खून प्रकरणातील फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी २० सप्टेंबर रोजी शेगाव येथून अटक केली आहे. त्याने बार्शीटाकळी तालुक्यातील आळंदा येथील मृतक शांताराम नागे याचा खून केला होता. घटना घडल्या पासून तो फरार होता.


बार्शीटाकळी पोलिस ठाण्याच्या हद्दीत आळंदा फाट्यावर रस्त्याच्या बाजूला शांताराम रमेश नागे याचा मृतदेह ८ सप्टेंबर रोजी पोलिसांना आढळून आला होता. सदर गुन्ह्यातील फरार आरोपी दिनेश महादेव नवलकार, वय ४० वर्ष, रा. आडसुळ फाटा, ता. तेल्हारा जि. अकोला हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता. तसेच त्याच्यावर सिव्हिल लाइन पोलिस ठाण्यात देखील गुन्हा दाखल असल्याने पोलिस त्याचा शोध घेत होते. दरम्यान या गुन्ह्याचा तपास सुरू असताना आज बुधवारी २० सप्टेंबर रोजी आरोपी हा शेगाव जिल्हा बुलढाणा येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या आधारे पोलिसांचे पथक शेगाव येथे रवाना झाले. यावेळी आरोपी दिनेश नवलकार याला पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली. पोलिसांनी त्याला तपासाकामी बार्शीटाकळी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. हि कारवाई पोलीस अधिक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधिक्षक, अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके, सपोनि. कैलास भगत, पो पोलीस उपनिरीक्षक गोपाल जाधव, ए. एस. आय. दशरथ बोरकर, राजपाल ठाकुर, गणेश पांडे, पोहवा. गोकुळ चव्हाण, प्रमोद डोईफोडे, फिरोज खान, सुलतान पठाण, भाष्कर धोत्रे, उमेश पराये, ना.पो.कॉ. अविनाश पाचपोर, महिंद्र मलिये, खुशाल नेमाडे, अन्सार अहेमद, लिलाधर खंडारे, स्वप्निल खेडकर, स्वप्निल चौधरी, आकाश मानकर, मो. आमीर, अभिषेक पाठक, धिरज वानखडे, पो. कॉ. चालक प्रशांत कमलाकर यांनी केली.

## हिंगणा रोड येथील एका जनावरात लंपी प्रादुर्भाव आढळला

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** येथील हिंगणा रोड परिसरातील एका नर वासरात लंपी त्वचारोगाचा प्रादुर्भाव आढळल्याने तेथील संसर्ग केंद्रापासून दहा किलोमीटर क्षेत्र प्रतिबंधित करण्यात आले आहे. तसा आदेश जिल्हा दंडाधिकारी अजित कुंभार यांनी आज निर्गमित केला. बाधित क्षेत्रातील जनावरांचे शेड निर्जंतुकीकरण करून परिसरात जनावरांची खरेदी व विक्री, वाहतूक, बाजार, जत्रा व प्रदर्शन आयोजित करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. संसर्ग केंद्राच्या ५ किमी परिघातील जनावरांना गोट पॉक्स लसीकरण १०० टक्के पूर्ण यावे, असे आदेश पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय यंत्रणेला देण्यात आले आहेत.





## महालक्ष्मीचे आगमनाने तालुक्यात भक्तीमय वातावरण

**तेल्हारा, तालुक्यातील दानापूर येथील रहिवाशी रामदास भालेराव यांचे घरी गौरी पूजनानिमित्त महालक्ष्मींची स्थापना करण्यात आली व महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच हिवरखेडं येथील डींगाबर ढगे यांच्या घरी सुद्धा महालक्ष्मींची स्थापना करण्यात आली आहे.**

**(दै. पब्लिक पोस्ट छायाचित्रः सोहन रितेश टीलावत)**




**कुणाल कमर्शियल कॉम्प्लेक्स गणेश उत्सव मंडळ, रणपिसे नगर चौक, अकोला.**

# जिल्ह्यातील ६८ टक्के शेतकरी ई-पीक नोंदींपासून अजूनही वंचित : मुदत २५ सप्टेंबरपर्यंत वाढवली

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** खरीप हंगाम २०२३ साठी ई-पीक पाहणी मोबाइल ॲपद्वारे पीक पेऱ्याच्या नोंदी करण्यासाठी अनेक ठिकाणी नेटवर्कचे किंवा सर्व्हर डाऊनचे अडथळे येत आहेत. तसेच बहुतांश शेतकऱ्यांना तांत्रिक बाबी समजत नसल्यामुळे नोंदी होण्यासाठी वेळ लागत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ६८ टक्के शेतकरी अजूनही या ई-पीक पेरा नोंदींपासून वंचित आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या असून, या नोंदी ऑफलाइन कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांमधून जोर धरू लागली आहे. दरम्यान, नोंदीत येणाऱ्या सर्व्हरच्या अडचणीचा विचार करता शासनाने ई-पीक नोंदी करण्याची मुदत आता २५ सप्टेंबर केली आहे.

ई-पीक पाहणी पेऱ्याच्या नोंदणी अभावी विविध अनुदान योजनांपासून शेतकरी वंचित राहत आहेत. मागील दोन वर्षांपासून ही पीक पेरा नोंद मोबाइल ॲपच्या सहाय्याने केली जाते. ही नोंद शेतकऱ्याला स्वतः शेतात जाऊन करावी लागते.

अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडे ॲड्राईड मोबाइल नसल्याने त्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे अजूनही बरेच शेतकरी पीक पेरा नोंदणीपासून वंचित आहेत. दरम्यान, ई-पीक पेऱ्याच्या नोंदणीची गती वाढवण्यासाठी विशेष मोहीम हाती घ्यावी, असे शासनातर्फे निर्देश देण्यात आले आहेत. यात सर्व महसूल व कृषी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विशेष मोहीम राबवून प्रचार, प्रशिक्षण व प्रसिद्धी करण्यासाठी प्रयत्न करावेत, . त्याबरोबरच विभागीय आयुक्त , विभागीय कृषी सहसंचालकांनी विभागीय पातळीवर तर जिल्हाधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी जिल्हास्तरावर आढावा घ्यावा, असेही कळवण्यात आले आहे अनेक शेतकऱ्यांकडे ॲड्राईड मोबाइल नाही. ज्या शेतकऱ्याकडे ॲड्राईड मोबाइल आहे. त्याच्याकडील ॲपमध्ये अडचणी येत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी अजूनही पीक पेऱ्याची नोंद केलेली नाही. अशातच शासनाने जाचक अटी शर्ती टाकून ही नोंदणी बंधनकारक केली आहे. त्यांनी नोंद न केल्यास कुठल्याही नुकसानीची मदत मिळणार नाही, त्यामुळे ही मोबाइल ॲपवरून ई-पीक पेरा सक्तीची नोंदणी रद्द करण्यात यावी, अशी मागणी उरळ (ता. बाळापूर) येथील शेतकरी पुत्र गोपाल पोहरे यांनी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी राज्याचे कृषी मंत्री व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना दिले आहे.

कृषी सहाय्यक, ग्रामसेवकांची मदत घेणार नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई अचूक व लवकर मिळण्यासाठी ही ई-पीक पाहणी पेऱ्याची नोंद आवश्यक आहे. सर्व्हर डाऊनमुळे तसेच शेतकऱ्यांना याचे तांत्रिक ज्ञान नसल्याने पीक पेरा नोंदीची गती संथ आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ३२ टक्के शेतकऱ्यांनी ई- पीक पाहणी करुन नोंद केली आहे.

# सेवा सप्ताह जनसेवा करण्याचे प्रभावी माध्यम -अनुप धोत्रे



पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** लोकसभा निवडणूक प्रमुख अनुप धोत्रे यांनी याप्रसंगी सेवा सप्ताह हा जनसेवा करण्याचे प्रभावी माध्यम आहे असे प्रतिपादन केले. भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यक्रम हे लोकाभिमुख असून जनतेच्या सुख दुःखामध्ये पक्षाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी नेहमी धावून जातात याबद्दल समाधान व्यक्त केले. देशाचा सर्वांगीण विकास हाच भाजपाचा ध्यास असल्याचे प्रतिपादन केले व विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन देशाची धुरा यशस्वीपणे सांभाळण्या करिता सक्षम व्हावे, असे आवाहन याप्रसंगी केले. या मुखदंत तपासणी शिबिराला डॉ विजय शर्मा डॉ श्रद्धा शर्मा व डॉ अपूर्वा गिरी यांनी निःशुल्क सेवा दिली. या कार्यक्रमाला उकंडराव सोनोने, नगरसेवक मिलिंद राऊत, संदीप शेगोकार, पूर्व मंडळ सरचिटणीस केशव हेडा, शिवलाल इंगळे, निलेश काकड, शुभम चंदन, प्रफुल खरात, पंकज ठाकरे, अजय पाटील हे उपस्थितीत होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मनपा शाळा क्रमांक २२ चे मुख्याध्यापक अर्जुन हिंगमिरे, हेमलता भिरड, अपर्णा ढोरे, विश्वशीला इंगळे, सविता वाघ, अर्चना पहुरकर, प्रकाश इंगळे, नयन देशमुख, श्रीराम खवले , हरिदास इंगळे यांनी परिश्रम घेतले. सातशे विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली व त्यांना उपचार औषधी देण्यात आल्या. जागृती करण्यात करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन ॲड देवाशिष काकड व अपर्णा ढोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक अर्जुन हिंगमिरे यांनी केले.

# तुमचा मुलगा माझ्या मुलीला कॉल कसा काय करतो ?

## सदर कारणावरुन तरुणाच्या आई वडिलांना जबर मारहाण

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** तुमचा मुलगा माझ्या मुलीला कॉल का करतो या कारणावरून तरुणाच्या आई वडिलांना जबर मारहाण करीत घरातील साहित्याची तोडफोड केल्याप्रकरणी चान्नी पोलिसांनी ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना खेट्री १९ सप्टेंबर रोजी घडली. बुधवारी आरोपींना अटक करून पातुर न्यायालयात हजर केले असता त्यांना जामीन मिळाला आहे.

### आठ जणांवर गुन्हा दाखल

या संदर्भात प्राप्त माहिती खेट्री येथील देवलाल ताले यांच्या घरी जाऊन गैरकायद्याची मंडळी जमवून घरात घुरून तुमचा मुलगा माझ्या मुलीला कॉल का करतो या कारणावरून राजेश सारंगधर क्षिरसागर रा.कौलखेड अकोला,दत्तात्रय नारायण तांदळे रा.सांगोळा ता.पातूर जि अकोला, सारंगधर रामकृष्ण क्षिरसागर रा.कौलखेड अकोला केशव तूकाराम गावंडे रा.कुपटा ता बाळापूर जि अकोला. रामेश्वर देवीदास वानखेडे रा.पिंपळगाव ता. बाळापूर जि अकोला.,शुभम केशव गावंडे रा.कूपटा ता. बाळापूर जि अकोला व इतर दोन अशा आठ जणांनी तरुणाच्या आई वडिलांना लाकडी काटी, लोखंडी पाईपने मारहाण करून, घरातील टिव्ही व मोबाईलच्या साहित्याची तोडफोड केली. या प्रकरणी पोलिसांनी ताले यांनी दिलेल्या तक्रारीवरून ८ जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले आहेत.या प्रकरणी पुढील तपास ठाणेदार योगेश वाघमारे करीत आहेत.

# शासकीय नोकऱ्यांचे कंत्राटीकरण विरोधात रायुकाँने केली निदर्शने

पब्लिक पोस्ट प्रतिनिधी

**अकोला, ता.२१ :** राज्य शासनाने शासकीय नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करण्याचा घाट घातला असून हा निर्णय बेरोजगारांवर आणि युवकांवर अन्याय करणारा आहे, असे म्हणत राष्ट्रवादी युवक काँग्रेसने सोमवारी निदर्शने केली. खुर्चीना कंत्राटी पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अशी फलके लावून निर्णयाचा निषेध नोंदवला. तसेच हा निर्णय शासनाने त्वरित मागे घ्यावा अशी मागणी करण्यात आली.



राज्य शासनाने नुकताच कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करण्याचा आदेश जारी केला आहे. या विरोधात महाराष्ट्र राज्यामध्ये शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस युवक आघाडीचे मेहबूब शेख यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात येत आहे. अकोल्यात मदनलाल धिंग्रा चौकात (मध्यवर्ती बस स्थानक) राष्ट्रवादी युवक काँग्रेसने या निर्णयाविरोधात निदर्शने केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे यांच्या मार्गदर्शनात महानगर जिल्हाध्यक्ष रफिकभाई सिद्दिकी व प्रदेश उपाध्यक्ष श्याम अवस्थी यांच्या प्रमुख उपस्थितीत युवक राष्ट्रवादी आघाडीमहानगर अध्यक्ष करण दोड यांच्या पुढाकारातआंदोलन करण्यात आले. यावेळी आनंद पिंटूवानखडे. महासचिव, पंकज गावंडे, परिमल लहाने,अरुण कडू, शेख मेहबूब,शोकात् अली, निसार खान,शामराव वाहुरवाघ, वसीम खान, बाबा घुमरे, पापा चंद्रपवार, अब्दुल जावेद, अक्षय भगेवार, सचिन निंबोकर,मो. मोसिन,अनसार अली, सफिक शाह, शुभम राऊत,प्रद्युम्न लोणकर, ऋषभ पिंजरकर, राज काळे, चिकूगावंडे, हर्षल भोजे, शाम कोहर,अभी मुंडे, सौरभअग्रवाल, अल्ताफ खान, वैभव भोजपत्रे, सौरभ झाडे,मो. जुनेद, मुकेश तराले, यश साठरोठे, संतोषबुंडे,अनस खान आदी होते.तर युवकांचे भविष्य अंधारकारमय कंत्राटी पद्धतीने भरती करत असताना स्पर्धापरीक्षांची तयारी करत असलेले युवक व त्यांचेभविष्य उद्या अंधारात जाईल व कित्येक युवकबेरोजगार राहतील.